**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# शृंखला

प्राचीन भारतीय तत्वविचारातील कर्मसिद्धान्त, गुरुत्वाकर्षणाचा शोध लावणारे सर आयझॅक न्यूटन आणि त्रिखंडविख्यात तत्वज्ञ कार्ल मार्क्स या तिघांमध्ये एक सूत्र समान आहे. स्थल–काल–व्यक्तीपरत्वे त्या सूत्राची अभिव्यक्ती निरनिराळी असावी, हे स्वाभाविक ठरते. कोणत्याही व्यक्तीने एखादे कर्म केले की त्यांतून कर्मांची एकातएक गुंफलेली जणू एक शृंखलाच निपजते. कर्माच्या स्वरू पानुसार आणि स्थळ–काळ–परिस्थितीनुसार त्या त्या कर्माचे भलेबुरे फळ यथावकाश निष्पन्न होते आणि कर्माचा कर्ता कळत न कळत अथवा आपातत: कर्माच्या साखळीमध्ये गुरफटला जातो, हा झाला भारतीय विचारपरंपरेतील कर्मसिद्धान्त. एका वेगळ्या भाषेत व वेगळ्या संदर्भात, क्रिया आणि प्रतिक्रिया या एकसमानच परंतु एकमेकांच्या विरुद्ध निपजतात, असे न्यूटन यांचे सिद्धान्तन सांगते. तर, अस्तित्वात असलेल्या कोणत्याही एखाद्या वास्तवाच्या विरोधी असे वास्तव, काळाच्या ओघात, मुळातील वास्तवाच्या अंतरंगात नांदणाऱ्या विसंवादाद्वारे आकाराला येते आणि त्या दोघांच्या संघर्ष–समन्वय–साहचर्याद्वारे आकारणारे तिसरे घटित त्या दोघांपेक्षाही अधिक सरस साकारते असे मार्क्स यांचे प्रतिपादन. मानवी समाजाची उत्क्रांती, अनादी काळापासून, विरोधविकासाच्या याच तत्वाद्वारे निरनिराळ्या टप्प्यांमधून आकार धारण करत आलेले आहे, हा मार्क्स यांचा जगप्रसिद्ध सिद्धान्त त्याच प्रतिपादनावर बेतलेला आहे. आपल्या अवतीभवती नीट न्याहाळून बघितले तर नेमके असेच काही सतत घडताना–बिघडताना आपल्याला दिसते. त्या अर्थाने आपले व्यक्तिगत तसेच सार्वजनिक जीवन स्वाभाविकत:च गतिमान व बदलते असते. साधारणपणे, दुसऱ्या महायुद्धानंतर ज्या प्रकारचे आर्थिक–सामाजिक–राजकीय वास्तव त्या धुम:श्चक्रीद्वारे अस्तित्वात आले ते त्या नंतर पुढील किमान साडेतीन ते चार दशके जगाच्या विभिन्न भागांत निरनिराळ्या स्वरूपांत व कमी–अधिक सघनतेने नांदले. त्या सगळ्या काळात निरनिराळ्या देशांत कारणपरत्वे जे अवघे साचलेपण दरम्यानच्या

काळात निपजले त्यांविरुद्धची व्यापक खदखद सुप्तासुप्तपणे ठिकठिकाणी नांदत होती. तिला तोंड फोडले तीन देशांतील तीन नेत्यांनी!

'आयर्न लेडी' म्हणून ज्या पुढे जगभरात विख्यात झाल्या त्या ब्रिटनच्या पहिल्यावहिल्या महिला पंतप्रधान मार्गारेट थॅचर, चित्रपटसृष्टीमधून थेट राजकारणाच्या रिंगणात उडी घेऊन अमेरिकेच्या अध्यक्षपदी विराजमान झालेले रोनाल्ड रेगन आणि पुढे सोव्हिएत रशियाच्या विघटनाची पायाभरणी करणारे मिखाईल गोर्बाचेव्ह हे ते तीन नेते. सत्तेवर येताच या तिघांनाही त्यांच्या त्यांच्या देशातील आर्थिक आघाडीवर साधारणपणे एकाच प्रकारच्या कोंडीला सामोरे जावे लागले. कुंठितावस्थेतील आपापल्या अर्थव्यवस्थांना पुनरुज्जीवन प्रदान करण्यासाठी या तीनही लोकाग्रणींना अतिशय कणखर निर्णय घेणे भाग पडले. त्या निर्णयांच्या पोटातून निपजलेल्या घटितांच्या शृंखलेमधील तीन निर्णायक घटनांना चालू कॅलेन्डर वर्षात ३५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्या तीन घटनांच्या अनुषंगाने, वैश्विक समुदायाच्या गेल्या साडेतीन दशकी वाटचालीचा या अंकात घेतलेला मागोवा रोचक वाटावा.

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी– 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्‌धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

# वळण

## तीन अंक, तीन घटना आणि साडेतीन दशके...

जगाच्या रंगमंचावर १९८०चे दशक सरता सरता तीन निर्णायक घटना साकारल्या. तीन वेगवेगळ्या देशांत काळाच्या निरनिराळ्या बिंदूंवर त्यांनी आकार धारण केला ही बाब खरी असली तरी त्या तीनही घटनांमध्ये एक समान सूत्र होते. एकांकिका नसेल तर रंगभूमीवर प्रगटणाऱ्या नाटकात साधारणपणे तीन अंक असतात. नाट्यप्रयोगातील तीनही अंक, म्हणले तर 'स्टॅन्ड अलोन' धर्तीचे असतात. परंतु, एक नाट्यसूत्र त्या तीनही अंकांना एकत्र गुंफून ठेवत असते. अगदी तसेच या बाबतीतही दिसते. जणू जगाच्या तीन देशांतील, तीन वेगवेगळ्या देशांच्या रंगमंचांवर, काळाच्या निरनिराळ्या बिंदूंवर तीन अंकी एक नाटक सादर झाले. उभा जागतिक समुदाय हा होता त्या तीन अंकी नाटकाचा प्रेक्षक. तर, स्वातंत्र्य, स्वायत्तता, स्वयंनिर्णयाची मोकळीक यांबाबतची असोशी हे होते या तीनही अंकांमधील समान सूत्र. या तीन अंकी नाटकामधील प्रत्येक अंकाचा एक वेगळाच नायकही होता. आणखी एक विलक्षण योगायोग म्हणजे, जरी हे नाटक तीन वेगवेगळ्या देशांत, निरनिराळ्या वेळी व वेगवेगळ्या नायकांच्या रंगभूमीवरील प्रवेशांनी गाजले तरी त्यांचे नाट्यबीज मात्र जवळपास एकाच कालखंडात रु जले गेले. साहजिकच, या तीन अंकांचे रंगमंचीय आविष्करण कालपटलाच्या साधारणपणे एकाच तुकड्यावर प्रगटले.

सोव्हिएत संघराज्याचे विघटन, विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त नेतृत्वाखाली चीनमधील तिआनमेन चौकात तब्बल ५० घुमलेले आंदोलन आणि दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीचे दोन तुकडे करणाऱ्या बर्लिनमधील भिंतीचे उच्चाटण हे ते तीन अंक. मॉस्को, बीजिंग आणि बर्लिन ही ती तीन शहरे. Mikhail Gorbachev, Dend Xiaoping आणि Gunter Schabowski हे अनुक्रमे मॉस्को, बीजिंग व बर्लिन येथे सादर झालेल्या तीन अंकांचे नायक. या तीन अंकांपैकी पहिला अंक मॉस्कोच्या रंगभूमीवर सादर झाला २६ मार्च १९८९ या दिवशी, बीजिंगमधील रंगमंचावर दुसरा

अंक साकारला ३ व ४ जून १९८९ यांच्या दरम्यानच्या ऐन मध्यरात्रीच्या समयास तर, बर्लिनमधील तिसऱ्या अंकाचा पडदा अकस्मातच उघडला गेला तो ९ नोव्हेंबर १९८९ या दिवशी. पहिल्या दोन अंकांचे नायक, अनुक्रमे Mikhail Gorbachev आणि Dend Xiaoping हे त्यांच्या त्यांच्या देशातील राजकीय रंगपटातील जानेमाने कलावंत होते. तर, Gunter Schabowski हे तिसरे पात्र मात्र आयत्या वेळी तोंडाला रंग फासून रंगमंचावर ढकलेले गेलेले होते. पहिल्या दोन पात्रांना ते वठवत असलेल्या भूमिकेची अतिशय सुस्पष्ट कल्पना होती. रंगमंचावर प्रगटल्यानंतर सादर करण्याची संहिता त्यांना तोंडपाठ होती. तिसऱ्या पात्राचे मात्र तसे नव्हते. लेखकाने लिहून घाईघाईने त्याच्या हातात कोंबलेल्या संहितेचे त्याने, ती प्रथम नीट वाचलेली नसतानाही, पठण केले आणि अंकाचा पडदा दाणदिशी वर गेला. सध्या चालू असलेल्या २०२४ या वर्षात या तीन अंकी नाटकाला पुरी साडेतीन दशके पूर्ण होत आहेत. वैश्विक रंगमंचावर सादरीकरण झाल्याझाल्याच या नाटकाने उदंड हलकल्लोळ उडवून दिलाच होता. परंतु, आता त्या नंतर पुरी साडेतीन दशके उलटून गेली तरी या नाटकाने 'वैश्विक समुदाय'नामक प्रेक्षकांच्या मनात तेव्हा निर्माण केलेले विचारतरंग अद्यापही खळखळत आहेतच.

ठिणगी, मग ती कोणतीही असो, तिचे रूपांतर हा हा म्हणता वणव्यात कसे व कधी घडून येईल, हे कोणालाही सांगता येत नसते. १९७०चे सरते दशक आणि १९८०च्या दशकाचा प्रारंभ जगाच्या जीवनात प्रवेश करता झाला तो सुधारणा आणि आर्थिक पुनर्रचना पर्वाचे ऐलान करतच. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर जगभरातच स्थिरावलेल्या शासनसंस्थाप्रणित आर्थिक विकासाच्या प्रारू पामध्ये रुजलेल्या नानाविध अकार्यक्षमता, भ्रष्टाचार यांनी गांजलेले त्या त्या देशांतील नागरिकांना आस लागून राहिलेली होती बदलाची. नागरिकांच्या मनात साठलेली खदखद जाणून देशोदेशींचे राजकीय नेतृत्व आपापल्या देशांतील व्यवस्थांमध्ये आवश्यक ते बदल व सुधारणा घडवून आणण्यास सरसावले. बराच काळ स्थिर झालेल्या व्यवस्थेमध्ये बदलांना हात घालणे हे प्रदीर्घ काळ बंद असलेले घर अथवा घरातीलच कुलुपबंद करून ठेवलेल्या एखाद्या खोलीची खिडकी उघडण्यासारखे असते. कारण, खिडकी किलकिली केल्यानंतर ती उघडणाऱ्याच्या हातात फारसे काही उरत नसते.

तीन देशांत साकारलेल्या तीन अंकांचे नायक ठरलेल्या Mikhail Gorbachev, Dend Xiaoping आणि क्रद्वदद्यङ्कद्ध Gunter Schabowski यांना नेमका तोच अनुभव त्यांच्या त्यांच्या देशात आला. एक वेळ, बंद ठेवलेले घर उघडणे सोपे

असते. कारण, घर उघडल्यानंतर बाहेरून आलेल्या वाऱ्यांनी जी काही उलथापालथ तिथे होते त्यापायी विस्कटलेली घडी पुन्हा नीट बसवणे हे घरमालकाला निदान शक्य तरी असते. घराचा तोच मालक असल्यामुळे दारे–खिडक्या उघडलेल्या घराची फेर मांडामांड करण्याचे स्वातंत्र्य व मुखत्यारी त्याच्या एकट्याच्या हातात असते. बंदिस्त राखलेल्या राजकीय आणि/अथवा आर्थिक व्यवस्थेचे दरवाजे अथवा खिडक्या किलकिल्या करण्याचे धैर्य बाळगणाऱ्या लोकनेत्यांची परिस्थिती मात्र पूर्णपणे निराळीच असते. उघडलेल्या दारामधून आत आलेले वारे समाजातील निरनिराळ्या घटकांवर कोणकोणते परिणाम घडवतील आणि त्यांनुसार वेगवेगळे समाजघटक सुधारणांच्या वाऱ्यांना नेमका कसा प्रतिसाद देतील, हे कोणत्याही नेत्याला, तो अगदी कितीही प्रगल्भ, दक्ष व सामर्थ्यशाली असला तरी, जोखता येणे शक्य नसते. समाजव्यवस्थेत नांदणारी विषमता आणि सुधारणांच्या माध्यमातून प्रवेशणारे लाभालाभ यांचे परस्परांशी असणारे नाते नेहेमीच व्यस्त असते.

समाजव्यवहारांत मुदलातच किती प्रमाणात व कशा प्रकारची विषमता नांदते त्यांवर पुनर्रचनेचे अथवा सुधारणांचे लाभ अथवा तोटे यांचे वेगवेगळ्या समाजघटकांदरम्यान होणारे वाटप ठरत जाते. सुधारणांच्या घुसळणीद्वारे निर्माण होणारे लोणी ज्यांच्या मुखात पडते ते आनंदाने डोलतात. तर, ज्यांना निखाऱ्यांना तोंड द्यावे लागते ते तळमळत घुसमट व्यक्त करत राहतात. बदलांच्या लाभार्थींची अवस्था लोण्याचा गोळा मटकवण्यास लालचावलेल्या बोक्यासारखी असते. सुधारणांची दिशा कायम राखण्याबरोबरच त्यांची गती वेगवान असावी, असा त्यांचा हेका असतो. सुधारणांच्या लाभार्थ्यांचा समाजव्यवहारातील तो वर्ग संख्यात्मकदृष्ट्या मोठा नसला तरी, आर्थिकदृष्ट्या संपन्न व मूल्यव्यवस्थात्मकदृष्ट्या चांगल्यापैकी एकात्म व संघटित असल्यामुळे त्याचा शासनसंस्थेवर बळकट दबाव राहतो. सार्वजनिक जीवनातील व्यासपीठे, माध्यमे, चर्चाविश्व हे तोच गट व्यापून असतो. साहजिकच मग त्या वर्गाचा धोरणनिश्चितीवरील प्रभाव दुर्लक्षण्याजोगा उरत नसतो.

पुनर्रचनेचे अथवा सुधारणांचे ऐलान करणाऱ्या नेतृत्वाची खरी अग्निपरीक्षा चालू होते ती नेमक्या याच बिंदूवर. बदलांच्या लाभांपासून वंचित राहिलेल्या बहुसंख्याकांची अभावग्रस्तता जितकी गहिरी बनत जाते त्या प्रमाणात सुधारणांचा गाभा, त्यांची दिशा व वेग यांना त्यांच्याकडून होणारा विरोध अधिकाधिक धगधगीत बनत जातो. सुधारणांच्या आगेकूचीबद्दल आग्रही असणारे समाजगट आणि सुधारणांच्या

फलिताबाबत असमाधानी असणारे समाजघटक यांच्या आक्रमक पवित्र्यांच्या कैचीत शासनसंस्था मग सापडते. कैचीच्या दोन्ही पात्यांना शासनसंस्था कशा प्रकारे सामोरी जाते हे तिच्या स्वरू पावर खूप प्रमाणात अवलंबून राहते. एखाद्या पक्षाची पोलादी पकड व्यवस्थेवर तसेच शासनावर असणाऱ्या हुकुमशाहीप्रधान देशांमध्ये प्रश्न उद्‌भवतो तो त्या व्यवस्थेतील सर्वोच्च नेतृत्व कोणत्या टप्प्यावर कोणत्या गटाला चुचकारते हा. प्रसंगी, सर्वोच्च सत्ता मुठीत ठेवणाऱ्या पक्षातच दोन गट असतात. एकाला कळवळा असतो सुधारणांच्या लाभांपासून वंचित राहिलेल्यांचा; तर, दुसऱ्या गटाला रस असतो तो बदलांच्या लाभार्थ्यांची तळी उचलून धरण्यात. त्या दोन गटांमध्ये आणि त्यांच्या नेत्यांमध्येही पुन्हा स्पर्धा असतेच. बहुपक्षीय स्पर्धात्मक राजकीय व्यवस्था नांदणाऱ्या समाजव्यवस्थांमध्ये तर हा झगडा अधिकच गुंतागुंतीचा असतो. राजकीय व्यवस्थेमध्ये कोणता पक्ष किती बलशाली आहे आणि मुख्य म्हणजे तो सत्ताधारी आहे की विरोधी बाकांवर बसलेला आहे त्यांवर त्या त्या पक्षाची सुधारणांची पाठराखण करण्यासंदर्भातील भूमिका बदलत राहते.

राजकीय स्पर्धेचे स्वरूप आणि तिची सघनता कितीही व कशीही असो, जे काही आर्थिक अथवा/आणि राजकीय बदल व्यवस्थेमध्ये प्रवर्तित केले जातात त्यांपायी शासनसंस्था आणि समाजपुरुषाची पसंती-नापसंती व्यक्त होण्यास खुला वाव देणारी 'बाजारपेठ'नामक दुसरी प्रबळ अशी स्पर्धक संस्था, या दोहोंमधील नात्याचा पोत गुणात्मकरीत्या आमूलाग्र बदलतो. शासनसंस्थेची गाभाप्रवृत्ती मुळातच दमनप्रवण असते तर बाजारपेठेचा स्वभावच लवचीक स्वायत्ततेला अवकाश पुरविणारा असतो. परस्परविरोधी कल असणाऱ्या या दोन संस्थांचे साहचर्य व्यवस्थेतील नेतृत्व किती प्रगल्भपणे सांभाळते त्यांवर मग बदलांच्या फलिताचे वाटप वेगवेगळ्या समाजघटकांमध्ये कसे होते अथवा होईल ते अवलंबून राहते. त्या साहचर्याचे आणि त्याचा तोल सांभाळताना उद्‌भवलेल्या समस्या-आव्हानांचे तीन अंकांमध्ये उमटलेले पडसाद विलक्षण बोलके आहेत.

**शासनसंस्थेची भूमिका कळीची...**

आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचा अंगीकार केल्यानंतर अर्थव्यवहाराच्या हाताळणीमध्ये बाजारपेठ हा जो दुसरा भिडू सक्रिय बनतो त्याच्याबरोबरचे साहचर्य जपण्यात शासनसंस्थेची भूमिका अतिशय कळीची ठरते. ही भूमिका असते दुपेडी. एक म्हणजे, 'खुली' अथवा 'मुक्त'बाजारपेठ म्हणजे 'अनिर्बंध' बाजारपेठ नव्हे, ही वस्तुस्थिती शासनसंस्थेने, तिच्या बाजारपेठेसंदर्भातील कार्यपद्धतीद्वारे, समाजाला

पटवून देणे अगत्याचे असते. खुल्या बाजारपेठेच्या चलनवलनाद्वारे निर्माण होणाऱ्या लाभांचे वाटप अर्थव्यवस्थेतील विविध घटकांना समन्यायी पद्धतीने घडून यावे याची दक्षता बाळगणे, हे शासनसंस्थेचे या संदर्भातील अतिशय महत्त्वाचे उत्तरदायित्व ठरते. त्यासाठी, प्रसंगी, बाजारपेठेमध्ये हस्तक्षेप करण्याचीदेखील तयारी शासनसंस्थेने ठेवणे गरजेचे असते. दुसरे म्हणजे, मुक्त बाजारपेठीय व्यवहारांद्वारे निर्माण होणाऱ्या लाभांचे उचित वाटप विविध समाजघटकांदरम्यान घडून येण्यात ज्या अनियमितता वा बाजारपेठीय व्यवस्थेच्या अकार्यक्षमता आड येतात त्यांचे निराकरण परिणामकारकपणे घडवून आणण्यासाठी अर्थकारणात नियामक संस्थादेखील क्रियाशील राखणे जरूरीचे ठरते.

हे न घडल्यास, अर्थव्यवस्थेतील बलदंड घटक शासनसंस्थेतील बलदंडांबरोबर प्रस्थापित झालेल्या त्यांच्या पूर्वापार हितसंबंधांचा लाभ उठवत मुक्त अर्थव्यवहारांच्याद्वारे निर्माण होणाऱ्या लाभांचे तूप आपल्याच पोळीवर ओढून घेण्यास सुरुवात करतात. शासनसंस्थेमध्ये सत्तेचे केंद्रीकरण जितके अधिक, शासनसंस्थेतील उच्च पदस्थांच्या ठायी वसणारी एकाधिकारशाहीप्रवण प्रवृत्ती जितकी अधिक, वशिलेबाजीस वाव जितका अधिक, नातलग अथवा पुत्रपौत्रांची वर्णी सत्तेच्या वाटपामध्ये लावण्याची मानसिकता जितकी प्रबळ तितका अधिक वाव नाना स्तरांवरील भ्रष्टाचार व अनियमितता यांना मग मिळत राहतो. अशा अपप्रवृत्तींचे प्रमाण तसेच वाढत राहिले


मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी
यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत २१ व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणाऱ्या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक : नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५          किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

की मग त्यांतून साकारणारे मुबलक गैरव्यवहार सर्वसामान्यांच्या डोळ्यांवर येऊन आर्थिक पुनर्रचनेसंदर्भातील असमाधान व असंतोष समाजमनात दाटू लागतो. यांतून व्यापक स्तरावर सामाजिक असंतोष निर्माण होण्यास वाव मिळत राहतो. राजकीयदृष्ट्या कडव्या अथवा अति उजव्या वृत्ती-प्रवृत्ती नेमक्या त्याच सामाजिक असमाधानाचा फायदा उठवत देशातील राजकीय व्यवस्थेमध्ये आपला जम बसवण्यास मग सरसावतात. सोव्हिएत रशिया, चीन आणि बर्लिनची भिंत पडल्यानंतर अस्तित्वात आलेला एकीकरणकृत जर्मनी या तीनही देशांमध्ये, थोड्या फार फरकाने हेच वास्तव उद्भवल्याचे आपल्या अनुभवास येते.

आर्थिक पुनर्रचना पर्वात प्रवेशलेल्या अर्थव्यवस्थांमध्ये सर्वसामान्यांचे कल्याण, पायाभूत नागरी सेवासुविधांचा पुरवठा आणि सुधारणांचे लाभ समाजातील विविघ घटकांपर्यंत झिरपावेत यासाठी शासनसंस्था कितपत व कशाप्रकारे सक्रिय बनते, हा ठरतो अर्थव्यवहारातील शासनसंस्थेच्या उदारीकरणपश्चात भूमिकेचा दुसरा पैलू. आर्थिक वाढविस्ताराचा वार्षिक सर्वसाधारण वेग मजबूत ठेवण्याबरोबरच त्यांद्वारे निर्माण होणाऱ्या सुबत्तेची झिरपण समाजाच्या विविध स्तरांतील लोकसमूहांपर्यंत होईल, याची दक्षता घेणारी धोरणे आखणे व त्यांची काटेकोर तामिली करणे, हे ठरते शासनसंस्थेचे या संदर्भातील मुख्य कर्तव्य. या आघाडीवर, समजा, कुचराई झाली अथवा शासनसंस्था कमकुवत शाबीत होऊ लागली तर, आर्थिक सुधारणांद्वारे साकारणाऱ्या आर्थिक सुबत्तेचे समाजातील तुलनेने सुधारलेल्या व सुस्थितीतील स्तरांमध्येच केंद्रीकरण चालू होते. त्यांमुळे, अर्थव्यवस्थेत एकीकडून विषमता वाढण्याबरोबरच दुसरीकडे बेरोजगारी, महागाई, खालावलेल्या पायाभूत सेवासुविधांपायी घसरलेला राहणीमानाचा सर्वसाधारण दर्जा अशांसारख्या समस्यांचा उद्‌भव होत राहतो.

म्हणजेच, उदारीकरणाला हात घातल्यानंतर जे वास्तव त्या प्रक्रियेद्वारे उभरते त्यांतून निपजणाऱ्या अंतर्विरोधांचा सामना करण्याबाबत शासनसंस्था कितपत सक्षम शाबीत होतात त्यांवर जनसामान्यांकडून त्या बदलांना मिळणाऱ्या प्रतिसादाच पोत अवलंबून राहतो. वैश्विक स्तरावर साडेतीन दशकांपूर्वी साकारलेल्या तीन अंकी नाटकाच्या प्रत्येक अंकामध्ये आविष्करण घडते ते त्याच विविधांगी प्रतिसादाचे!

# रशिया

## तारेवरच्या कसरतीचे अकल्पित फळ

गरीब शेतकरी कुटुंबात जन्माला आलेले मिखाईल गोर्बाचेव्ह ख्रिस्ती धर्मविचारांच्या चौकटीत लहानाचे मोठे झाले. रशियन आणि युक्रेनियन अशा उभय वंशांचा वारसा गोर्बाचेव्ह यांना लाभलेला होता. २ मार्च १९३१ रोजी जन्माला आलेल्या गोर्बाचेव्ह यांचे बालपण व्यतीत झाले ते स्टॅलिन यांच्या पोलादी पकडीतील सोव्हिएत रशियामध्ये. मॉस्को विद्यापीठातून कायद्याची पदवी पदरात पाडून घेतलेले गोर्बाचेव्ह, त्या मानाने अगदी तरूण वयापासूनच, कम्युनिस्ट पक्षाच्या प्रांतीय उतरंडीमध्ये डोळ्यांत भरण्याइतके सक्रिय होते. साहजिकच, कम्युनिस्ट पक्षाच्या सत्तेची उतरंड सर करणे त्यांना तुलनेने बरेच सुकर ठरले ते नेमके त्यांच्या क्रियाशीलतेमुळेच. अखेर, चेर्नेन्को यांच्या देहावसानानंतर सत्तासोपान सर करण्यासाठी सोव्हिएत संघराज्यात माजलेल्या संघर्षात गोर्बाचेव्ह यांनी बाजी मारली आणि कम्युनिस्ट पक्षाचे सर्वोच्च नेते म्हणून ते वैश्विक सत्तापटलावर एकदम मोक्याच्या ठिकाणी आले. सोव्हिएत संघराज्यातील तत्कालीन राजकीय वर्तुळात गोर्बाचेव्ह यांचे व्यक्तिमत्व त्यांच्या राजकीय प्रवासादरम्यानदेखील एकदमच आगळे ठरत आलेले होते ते त्यांना लाभलेल्या पार्श्वभूमीमुळे. मुळात, तत्कालीन कम्युनिस्ट पक्षाच्या उतरंडप्रधान नेतृत्वप्रणालीमध्ये तरूण गोर्बाचेव्ह यांचा प्रवेश घडून आला तोच मुळात स्टॅलिन यांचे पर्व अस्तंगत झाल्यानंतर. साहजिकच, स्टॅलिन यांची एकाधिकारशाही आणि एकंदरच सोव्हिएत राजकीय प्रणालीवर असणारा मार्क्स व लेनिन यांच्या विचारसरणीचा घट्ट पगडा या दोहोंच्या सावटापासून गोर्बाचेव्ह प्रथमपासूनच अस्पर्श राहिले. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, सोव्हिएत विचारविश्वावर प्रदीर्घ काळ पकड गाजवलेल्या पूर्वकालीन वैचारिक चौकटीपासून गोर्बाचेव्ह मुक्त होते व राहिले. सोव्हिएत संघराज्याच्या अंतरंगात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्यास गोर्बाचेव्ह पुढे सिद्ध झाले त्याला कारणभूत ठरली ती जाणत्या वयापासून आकार घेत आलेली त्यांची जडणघडणच.

किंबहुना, गोर्बाचेव्ह यांची एकंदर पिढीच त्या बाबतीत आगळीवेगळी ठरली. गोर्बाचेव्ह यांचा आणि पर्यायाने त्यांच्या सगळ्या पिढीचाच पाश्चिमात्य संस्कृती, विचारधारा, पाश्चिमात्य विश्वात साकारत असलेले बदल, तिथे निपजलेली वैचारिक स्थित्यंतरे यांच्याशी घडून आलेला परिचय त्यांच्या आधीच्या पिढ्यांपेक्षा किती तरी अधिक सघन व गुणात्मकरीत्या भिन्न ठरला. पाश्चिमात्य राष्ट्रांमधील व्यावसायिकांचा विस्तारणारा वर्ग, त्यांच्या समाजात अशा व्यावसायिकांचा उत्तरोत्तर बुलंद बनत चाललेला आवाज, देशी अर्थव्यवस्थेत ज्या सुधारणा घडवून आणणे अनिवार्य बनलेले आहे अशा सुधारणा राबविल्या जाण्याबाबत त्या वर्गाचा असलेला आग्रह... यांसारख्या घडामोडी अतिशय जवळून, आस्थेने व सूक्ष्मपणे न्याहाळतच गोर्बाचेव्ह यांच्या व्यक्तिमत्वाला प्रगल्भ पैलू पडत राहिले. सोव्हिएत कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव म्हणून १९८५ साली गोर्बाचेव्ह नियुक्त झाले त्या वेळी सोव्हिएत संघराज्याची अर्थव्यवस्था बिकट पर्वामधून प्रवास करत होती.

आर्थिक व्यवस्थापनासंदर्भात कमालीच्या केंद्रीय नियोजनप्रधान धोरणप्रणालीचा अवलंब प्रदीर्घ काळ केल्यामुळे सोव्हिएत अर्थव्यवस्था पार कुंठितावस्थेला पोहोचलेली होती. त्यांतच, शीतयुद्धाचे ताण त्या व्यवस्थेमध्ये सर्वत्र पसरलेले होते. अमेरिकेच्या शस्त्रसज्जतेशी तुलना करत त्या आघाडीवर तुल्यबळता प्राप्त करण्याच्या असोशीपायी शस्त्रास्त्रस्पर्धा व संरक्षणसिद्धतेवर प्रचंड पैसा खर्च केला जात होता. रोनाल्ड रेगन यांनी अमेरिकी संरक्षणव्यवस्था अभेद्य बनविण्यासाठी प्रवर्तित केलेल्या कार्यक्रमाला तोडीसतोड संरक्षणसिद्धता सज्ज राखण्याचे आव्हानवजा उद्दिष्ट सोव्हिएत नेतृत्वाच्या नजरेसमोर सततच स्थिर होते. परिणामी, सरकारी खर्चाचा अतिशय मोठा भाग संरक्षणाकडे वळवला जात असे. त्या अपरिहार्यतेपायी सर्वसाधारण आर्थिक विकासाच्या आघाडीवर निधीची चणचण भासत राही. १९८०च्या दशकामधील सोव्हिएत आर्थिक कुंठिततेचे मुख्य कारण नेमके हेच ठरत राहिले.

या पार्श्वभूमीवर, सोव्हिएत संघराज्याच्या सर्वोच्च सत्तेची सूत्रे हाती आल्यानंतर, १९८६ साली सोव्हिएत कम्युनिस्ट पक्षाच्या आयोजित करण्यात आलेल्या २७व्या अधिवेशनादरम्यान गोर्बाचेव्ह यांनी दोन कलमी कार्यक्रम त्या व्यासपीठावरून सादर केला. Perestroika आणि Glasnost हाच तो दुहेरी कार्यक्रम

घटनाचक्र पालटवणाऱ्या दोन संकल्पना

सोव्हिएत संघराज्याच्या अर्थव्यवस्थेची संपूर्ण पुनर्रचना हा होता Perestroika या संज्ञेचा अर्थ; तर, सर्व स्तरांवर खुलेपणा हा होता Glasnost या संज्ञेचा

आशय. केवळ सोव्हिएत संघराज्याचेच नव्हे तर, उभ्या जगाचे घटनाचक्र पुढील केवळ सहाच वर्षांत विस्मयकारकपणे फिरवण्यास कारणभूत ठरल्या त्या याच दोन संज्ञा. सोव्हिएत संघराज्यातील शेतीक्षेत्राबरोबरच उद्योगांचे खासगीकरण घडवून आणणे, एकंदरीनेच सोव्हिएत अर्थव्यवस्थेत नफ्याच्या प्रेरणेला मान्यता व स्वीकृती प्रदान करणे, खुल्या बाजारपेठीय व्यवहारांनुसार साकारणाऱ्या वाटप व वितरणाला होकार दर्शवणे, अर्थव्यवस्थेत उपलब्ध असणाऱ्या उत्पादक घटकांचे वितरण बाजारपेठीय किमतींच्या दिशादर्शनाद्वारे घडवून आणणे... या साऱ्या बाबींचा समावेश Perestroika या संज्ञेमध्ये होता. तर, माध्यमांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य बहाल करणे, सेन्सॉरशिपचा काच सैल करणे, व्यक्तिस्वातंत्र्याचा पैस विस्तारणे.., अशांसारख्या बाबींचा अंतर्भाव H«$ÏÇ>ÙXÑÙÚ या संकल्पनेमध्ये केलेला होता. कुंठित बनलेली सोव्हिएत अर्थव्यवस्था आणि नाना प्रकारच्या बंधनांनी जखडलेले समाजजीवन यांपायी कातावलेल्या सर्वसाधारण सोव्हिएत जनमानसाने गोर्बाचेव्ह यांच्या त्या दुपेडी सुधारणा प्रस्तावाचे मोठ्या उत्साहाने स्वागत केले. त्यांत अस्वाभाविक असे काहीच नव्हते. परंतु, सत्तेच्या सर्व दोऱ्या आपल्या हातात एकवटून राखण्यास सरावलेले कम्युनिस्ट पक्षातील अन्य नेते मात्र गोर्बाचेव्ह यांच्या त्या पवित्र्याकडे साशंकतेनेच पाहत होते.

शीतयुद्धाच्या पर्वादरम्यानचे यच्चयावत ताणतणाव आणि त्या आघाडीवरील शस्त्रसज्जतेच्या पाठपुराव्यापायी संरक्षण व शस्त्रास्त्रस्पर्धेवर केला जाणारा अतोनात खर्च यांचे अतिशय मोठे सावट सोव्हिएत अर्थविकासाच्या प्रक्रियेवर अपरिहार्यपणे पडत राहिले व पडत आले. Perestroika आणि Glasnost या दोन्ही बदलांना चालना देण्यासाठी शीतयुद्धाला विराम देणे अनिवार्य होय, हे वास्तव गोर्बाचेव्ह यांनी मनोमन जाणले व अमेरिकेबरोबरील संबंधांमध्ये त्या संदर्भात अनुरूप असे बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी पावले उचलली. दोन्ही देशांमधील शस्त्रास्त्रस्पर्धेला आळा घालण्यासंदर्भातील करार १९९१ साली साकारण्यात गोर्बाचेव्ह यांची भूमिका भरीव राहिली.

शस्त्रास्त्रस्पर्धेपायी जो पैसा संरक्षणसिद्धता व प्रहारक्षमता सक्षम राखण्याकडे खर्च होतो तो वाचवल्याखेरीज सुदृढ आर्थिक विकासाकरिता आवश्यक असलेला निधी हाताशी येणार नाही हे अचूक हेरलेल्या गोर्बाचेव्ह यांनी मग केवळ लष्करीबाबतीतच नव्हे तर एकंदरच राजकीय व खासकरून सोव्हिएत राष्ट्रसंघाच्या परदेशविषयक पारंपरिक धोरणांमध्येदेखील अनुरूप बदल घडवून आणण्यास प्रारंभ केला. २५

डिसेंबर १९७९ या दिवशी सोव्हिएत फौजा अफगाणिस्तानाच्या भूमीवर पाय ठेवत्या झाल्या होत्या. केवळ अफगाणिस्तानच नव्हे तर अंगोलामध्येदेखील सोव्हिएत फौज संघर्षरत होती. कम्युनिस्ट पक्षाच्या २७व्या अधिवेशनादरम्यान स्पष्ट केलेल्या विदेशविषयक धोरणास अनुसरून सोव्हिएत सैन्य अफगाणिस्तानातून परत बोलवण्याच्या प्रक्रियेला १५ मे १९८८ पासून सुरु वात झाली आणि १५ फेब्रुवारी १९८९ रोजी सोव्हिएत फौजांच्या शेवटच्या तुकडीने अफगाणिस्तानातून पाय बाहेर काढला. अंगोलामधूनही सोव्हिएत तुकड्या काढून घेण्यात आल्या.

सोव्हिएत राष्ट्रसंघाच्या सत्तेची सूत्रे प्रदीर्घ काळ आपल्या हातात राखलेल्या लिओनीद ब्रेझनेव्ह यांच्या काळापासून अवलंबण्यात आलेल्या विदेशविषयक धोरणामध्ये निर्णायक बदल घडवून आणण्याचा भाग म्हणून निकाराग्वा, क्यूबा व व्हिएतनाम येथील शासनकर्त्यांना सोव्हिएत राष्ट्रसंघाने पुरवलेले पाठबळ गोर्बाचेव्ह यांनी काढून घेतले. त्यांहीपुढे जात, साम्यवादी विचारसरणी धोक्यात येऊ घातलेल्या देशांच्या मदतीसाठी व पर्यायाने त्या देशांमधील साम्यवादी विचारप्रणालीच्या रक्षणासाठी, प्रसंगी, तिथे थेट हस्तक्षेप करण्याच्या ब्रेझनेव्ह यांनी जपलेल्या धोरणदृष्टीलाही तिलांजली देण्यापर्यंत गोर्बाचेव्हप्रणीत सुधारणांनी छलांग मारली. ब्रेझनेव्ह यांनी जपलेल्या त्या परदेशविषयक धोरणाचे वर्णन 'ब्रेझनेव्ह तत्वप्रणाली' (ब्रेझनेव्ह डॉक्ट्रिन) अशा शब्दसंहतीद्वारे करण्यात येत असे. सोव्हिएत संघराज्याच्या एकंदरच फेरमांडणीच्या उपक्रमाचा एक भाग म्हणून पूर्व युरोपीय देशांवरील सोव्हिएत राष्ट्रसंघाची पोलादी पकड क्रमाक्रमाने ढिली करण्याच्या दिशेने गोर्बाचेव्ह यांनी पावले उचलण्यास सुरुवात केली. आपले भविष्य ठरविण्याबाबत पूर्व युरोपीय देशांनी त्यांचा मार्ग व प्रवास निश्चित करावा, या बाबतची स्वायत्तता त्यांना बहाल करणे हा गोर्बाचेव्ह यांच्या बदललेल्या धोरणाचा गाभा होता. सोव्हिएत संघराज्याच्या विघटनाची पायाभरणी

आपण निवडलेल्या दिशेने वाटचाल करण्यासाठी आवश्यक वाटणारी धोरणे आखण्याची व राबविण्याची मोकळीक पूर्व युरोपीय देशांना बहाल करावी अशा प्रकारचे जे धोरण गोर्बाचेव्ह यांनी अंगीकारले त्याला 'सिनाट्रा तत्वप्रणाली' (सिनाट्रा डॉक्ट्रिन) असे तिथे संबोधण्यात येऊ लागले. गोर्बाचेव्हा यांच्या त्या तत्वप्रणालीच्या अंगीकारामुळे लोकशाहीपूरक आणि स्वातंत्र्य व स्वायत्तता यांचा पाठपुरावा करणाऱ्या वृत्ती-प्रवृत्तींना पूर्व युरोपातील अनेक देशांमध्ये स्फुरण चढले. पूर्व युरोपातील त्या सगळ्या बदलत्या वाऱ्यांची परिणती घडून आली ती १९८९ सालातील नोव्हेंबर

महिन्याच्या नऊ तारखेस पूर्व जर्मनी आणि पश्चिम जर्मनी या दोहोंना परस्परांपासून अलग करणाऱ्या बर्लिनमधील भिंतीचे पतन होण्यात. बर्लिनमधील भिंत कोसळणे ही एक विलक्षण निर्णायक घटना शाबीत झाली. साम्यवादी विचारसरणी जोपासणाऱ्या सत्तांचे पूर्व युरोपातील देशांमध्ये विसर्जन घडून येण्याच्या प्रक्रियेची ती जणू नांदीच ठरली.

एकीकडे हा सारा घटनाक्रम अशा प्रकारे उलगडत असतानाच, खुद्द सोव्हिएत संघराज्यामध्ये अध्यक्षीय पद्धत प्रस्थापित व्हावी यांसाठी गोर्बाचेव्ह दुसरीकडे प्रयत्नशील बनत होते. बहुपक्षीय राजकीय स्पर्धेवर आधारित निवडणूकप्रधान प्रणाली सोव्हिएत व्यवस्थेमध्ये निर्माण होऊन स्थिरावणे हे त्यासाठी अत्यावश्यक होते. या संदर्भातील निर्णयांती गोर्बाचेव्ह यांनी उचललेल्या पावलांपायी लोकशाहीप्रधान शासनप्रणालीकडे धीमी वाटचाल सुरू होण्याच्या प्रक्रियेचे बीजारोपण तिथे घडून आले. १९९० साली पार पडलेल्या निवडणुकांद्वारे त्या प्रक्रियेला तिथे मूर्त स्वरूप लाभले. परंतु, त्यातूनच गोर्बाचेव्ह यांच्या पुढ्यातील आव्हानांमध्ये भर पडू लागली. प्रचंड प्रमाणावरील राजकीय दबावाचा रेटा निवडणुकांच्यापश्चात गोर्बाचेव्ह यांच्यावर निर्माण झाला. ठाकला. सोव्हिएत व्यवस्थेमध्ये अधिक प्रमाणावर लोकतंत्रप्रधान शासनप्रणालीचा अवलंब केला जावा आणि आर्थिक सुधारणा अधिक वेगाने घडून आणल्या जाव्यात यांबद्दल गोर्बाचेव्ह यांचे एकेकाळचे पाठीराखे बोरिस येल्त्सिन यांचा आग्रह आक्रमक बनू लागला. तर, या बदलांना विरोध असणाऱ्या कडव्या साम्यवाद्यांचाही विसंवादी सूर त्याच वेली बलवान बनत होता.

सोव्हिएत संघराज्यामध्ये गोर्बाचेव्ह साध्य करू पाहत असलेल्या बदलांना अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जॉर्ज बुश यांचा पूर्ण पाठिंबा होता. ज्या प्रकारच्या सुधारणा राबविण्याचा प्रयत्न गोर्बाचेव्ह करत होते त्यांच्या सिद्धीद्वारे सोव्हिएत संघराज्यामध्ये लोकतंत्रप्रधान व्यवस्था साकारण्याबरोबरच तिथे खुल्या बाजारपेठीय अर्थकारणाचे युगही अवतरेल, अशी बुश यांना अपेक्षा होती. परंतु, काळाच्या नेमक्या त्याच वळणावर गोर्बाचेव्ह एका मोठ्या मानसिक द्वंद्वाचा सामना करत होते, असे संशोधकांचे प्रतिपादन आहे. आर्थिक क्षेत्रांत सोव्हिएत राष्ट्रसंघाने तिथवर जपलेल्या समाजवादी धोरणदृष्टीबाबत नेमकी काय भूमिका घ्यावी हे मात्र गोर्बाचेव्ह यांना सुधारणांच्या त्या टप्प्यावर उमगत नव्हते, असे या प्रांतातील अभ्यासकांचे निरीक्षण आहे. पूर्वापार जपलेल्या समाजवादी विचारप्रणालीबाबत एकीकडे प्रेम तर वाटते परंतु, त्याच विचारधारेचा पाठपुरावा करत राहिल्याने अडचणीत आलेल्या सोव्हिएत

अर्थव्यवस्थेचे पुनरु त्थान कसे साध्य करावयाचे, या वैचारिक कैचीमध्ये गोर्बाचेव्ह अडकून पडले असे तज्ज्ञांचे विश्लेषण सांगते.

बोरिस येल्त्सिन यांनी उभ्या केलेल्या कडव्या आव्हानापायी राजकीय बळाला क्षती पोहोचलेले गोर्बाचेव्ह सर्वंकष सुधारणा प्रत्यक्षात राबविण्याबाबत कितपत सक्षम ठरतील यांबद्दल बुश यांना मग आशंका वाटू लागली. मात्र, येल्त्सिन यांच्या तुलनेत बुश यांच्या हिशेबी गोर्बाचेव्ह यांची विश्वासार्हता अधिक असल्याने अमेरिकेने सावध परंतु दुटप्पी पवित्रा तिथे अंगीकारला. एकीकडून गोर्बाचेव्ह यांची पाठराखण करत असतानाच दुसरीकडे बोरिस येल्त्सिन यांच्याशीही बुश यांनी संवाद जारी राखला. अशा सगळ्या अस्थिर वातावरणातच, कम्युनिस्ट पक्षातील कडव्या गोर्बाचेव्ह विरोधकांनी १८ ऑगस्ट १९९१ या दिवशी बंड करत सुटीसाठी बाहेर अन्य एका ठिकाणी गेलेल्या गोर्बाचेव्ह यांना त्यांच्या निवासस्थानीच नजरकैदेत जखडून ठेवले. गोर्बाचेव्ह यांच्या विरोधातील तो उठाव दोन दिवसांतच पुरता फसला हे जरी खरे असले तरी, सत्तेवरील त्यांची उरलीसुरली मांडही त्यांमुळे पुरती निखळली हे मात्र कोणालाच अमान्य करता येणार नाही. या सगळ्या घटनाक्रमाची परिणती, प्रथम सोव्हिएत कम्युनिस्ट पक्षाची वाताहत होण्याबरोबरच उठावानंतर केवळ चारच महिन्यांत सोव्हिएत संघराज्याचे विघटन होण्यात घडून आली.

**'गोर्बाचेव्ह डॉक्ट्रिन'ची अहेतुक परिणती**

सोव्हिएत कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस म्हणून ११ मार्च १९८५ रोजी पदभार स्वीकारलेल्या मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी त्यांच्या डोळ्यांसमोर दोन मुख्य ध्येये अथवा उद्दिष्टे ठेवलेली होती. पूर्णत: हतप्रभ झालेल्या सोव्हिएत अर्थव्यवस्थेत जान फुंकणे हे होते त्यांतील एक तर, ढिसाळ, मंद, जडावलेल्या नोकरशाहीला झडझडून कार्यप्रवृत्त करणे, हे होते त्यांतील दुसरे उद्दिष्ट. Perestroika आणि Glasnost या दोन संकल्पनांचे प्रवर्तन गोर्बाचेव्ह यांनी हिरिरीने घडविले ते त्याच दुहेरी हेतूंनी. परंतु, गोर्बाचेव्ह यांनी उचललेल्या त्या सुधारणात्मक पावलांचे पुढे व्यवहारात कमालीचे अनपेक्षित परिणाम साकारले. साम्यवादी विचारसरणीमध्ये कालानुरूप नवीन धारणांचे, प्रबोधनाचे पर्व गतिमान बनावे हा होता Glasnost मागील गोर्बाचेव्ह यांचा मूळ इरादा. मात्र, त्यांतून प्रथम निपजली ती उभ्या सोव्हिएत संघराज्याच्या प्रयोगाचीच कठोर चिकित्सा. लोकतंत्रात्मक राज्यव्यवस्था प्रस्थापित करण्याच्या प्रेरणांना Glasnost द्वारे सोव्हिएत मानसिकतेमध्ये बढावा मिळाला यात वाद नाही. परंतु, त्याच वेळी समाजमाध्यमे आणि जनमत या दोहोंवरील शासनसंस्थेचे नियंत्रण पूर्णत: हरपले हेदेखील तितकेच खरे.

गोर्बाचेव्ह यांनी सत्ता हाती घेतल्यानंतर लगेचच अशा दोन गोष्टी सोव्हिएत समाजात घडल्या की ज्यांमुळे सोव्हिएत संघराज्य व्यवस्थेच्या तिथवर चिरेबंदी समजल्या जाणाऱ्या व्यवस्थेला प्रारंभीचे तडे जाण्याची प्रक्रिया एकाएकी वेग पकडती झाली. त्या प्रक्रियेने गती पकडण्यास मुख्यत्वे कारणभूत ठरला तो सोव्हिएत समाजमनाला Glasnost च्या माध्यमातून अभिव्यक्तीसंदर्भात खुला झालेला अवकाश. गोर्बाचेव्ह यांनी सत्ता हाती घेतल्यानंतर काहीच महिन्यांतच, म्हणजे, २९ एप्रिल १९८६ या दिवशी चेर्नोबील येथील अणुभट्टीतून गळती सुरू होऊन किरणोत्सर्जनाचे संकट ओढवले. ती गळती थांबविण्यात तंत्रज्ञांना यश आले परंतु त्या संदर्भात प्रथम सोव्हिएत नागरिकांना आणि पर्यायाने वैश्विक समुदायाला विश्वासात घेऊन त्या संकटाचे एकूण गांभीर्य व त्यांतून उद्‌भवणारे संभाव्य धोके यांबाबत सजग करण्याच्याबाबतीत मात्र Glasnost च्या गाभासंकल्पनेशी संपूर्णतया विसंगत असेच वर्तन समस्त कम्युनिस्ट नेतृत्वाचे राहिले.

मुळात, कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाने अतिशय त्वरेने पावले उचलली ती चेर्नोबील येथील अणुभट्टीत उद्‌भवलेल्या गळतीबाबत कोठेही बातम्या प्रसृत होऊ नयेत याबद्दलच. गळतीसंदर्भातील तथ्य व तपशील नितळपणे विदित करण्याऐवजी सोव्हिएत नेतृत्वाने खाक्या अवलंबला तो माहिती दडपण्याचाच. उलट, सारे काही आलबेल आहे, असेच कथन कम्युनिस्ट नेते सतत करत राहिले. पुढे विविध मार्गांनी व माध्यमांद्वारे जसे व जेव्हा त्या भयंकर घटनेचे परिणाम तसेच वृत्तांकन समाजमानसाच्या पुढ्यात येऊ लागले तसतशी सोव्हिएत व्यवस्थेबाबतची उरलीसुरली विश्वासार्हतादेखील वेगाने घसरणीला लागली.

जवळपास तसेच काहीसे घडले ते अफगाणिस्तानच्या संघर्षासंदर्भात. १९७९ साली सोव्हिएत फौजा अफगाणिस्तानात घुसल्या होत्या. अदमासे १० लाखांपर्यंत सोव्हिएत सैन्य अफगाणिस्तानच्या भूमीवर तिथून पुढे दहा वर्षे, म्हणजे, १९८९ सालापर्यंत लढत राहिले. त्यांत १५ हजारांच्या आसपास सोव्हिएत सैनिकांनी देह ठेवला तर अन्य हजारो जखमी झाले. निष्पाप अशा जवळपास १० लाखांपर्यंत अफगाण नागरिक त्या संघर्षात बळी पडले तर त्याच्या चौपट नागरिक युद्धापायी बेघर होऊ न देशोधडीस लागले. संरक्षणावरील खर्चात कपात करण्याच्या हेतूने गोर्बाचेव्ह यांनी प्रवर्तित केलेल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून अफगाणिस्तानातून सोव्हिएत फौजा मागे घेण्यात आल्या हे तर खरेच. परंतु, त्याच वेळी, Glasnost च्या पदरवाद्वारे माध्यमांवरील बंधने हटून माहितीचे आदानप्रदान सुलभ होऊ लागल्याने

अफगाण युद्धाबाबतचे प्रतिकूल लोकमानस तीव्रपणे व्यक्त होऊ लागलेले होते, हेदेखील दुसरे कारण होतेच. अफगाणिस्तानात सोव्हिएत सैन्याच्या तामिलीद्वारे घडून येत असलेल्या रक्तपाताविरुद्ध तर युक्रेनमध्ये व्यापक स्तरावरील जनाक्रोश रस्त्यावरील उत्स्फूर्त चळवळींच्या रूपाने प्रगटला. मध्य आशियाई ज्या युरोपीय देशांमधील सैनिक अफगाणिस्तानात तैनात असलेल्या सोव्हिएत तुकड्यांमध्ये होते त्यांपैकी काहींचे अफगाण नागरिकांशी धार्मिक आणि/अथवा वांशिक अनुबंध होते. साहजिकच, आपल्या बांधवांशी लढण्याबाबत त्यांच्या मनात असंतोष व चीड होती. यांसारख्या घटनांपायी सोव्हिएत संघराज्यातून वेगळे होण्याच्या प्रवृत्तींना त्या त्या देशात कारण सापडले.

जे Glasnost च्या बाबतीत घडले जवळपास तसेच काहीसे Perestroika च्याही संदर्भात खरे शाबीत झाले. केंद्रवर्ती नियोजनप्रधान अर्थव्यवस्थापनाच्या पकडीत घुसमटलेल्या सोव्हिएत अर्थकारणाला अंमळ मोकळा श्वास घेता यावा आणि शासनसंस्थेचीच मालकी असल्याने पुरत्या संरक्षित बनलेल्या जडशीळ सरकारी उद्योगांना बाजारपेठीय स्पर्धेच्या झुळुका लागून त्यांचे चलनवलन सुधारावे, हा गोर्बाचेव्ह यांचा मुख्य हेतू होता Perestroikaचे ऐलान करण्यामागे. प्रत्यक्षात, भांडवलशाही आणि साम्यवादी अर्थकारण या दोन्ही व्यवस्थांमधील वैगुण्येच मुख्यत: Perestroikaने ठसठशीतपणे अधोरेखित केली. बरे, त्या अंतर्गत असलेल्या खुलेपणाचा अंमलही सर्वदूर एकाच सघनपणे घडून आला नाही. काही बाजारपेठांमधील किमतींवरील नियंत्रणे हद्दपार झाली हे खरे. परंतु, अर्थप्रशासनाची साम्यवादी चौकट बहुश: कायम राहिली. परिणामी, स्वत:च्या स्वार्थसाधनाआड येणाऱ्या सुधारणांना नोकरशाहीने पार अडगळीत फेकून दिले. साहजिकच, त्यांमुळे मग Perestroikaची अंमलबजावणी पूर्णपणे व यथार्थ पद्धतीने तिथे होऊ शकलीच नाही.

समाजवादावरील प्रेमापायी त्या विचारसरणीची कास घट्ट धरू न ठेवत असतानाच सोव्हिएत संघराज्याची एकसंधता कायम राखण्याची तारेवरील जी कसरत गोर्बाचेव्ह करत राहिले तिला आलेले अकल्पित फळ म्हणजे सोव्हिएत संघराज्याचे २६ डिसेंबर १९९१ या दिवशी अधिकृतपणे आलेले विघटन. अर्थात, त्या विघटनाचे बीजारोपण त्याच्या पूर्वी तीन वर्षे गोर्बाचेव्ह यांनीच घडवून आणलेल्या सोव्हिएत संघराज्याच्या घटनादुरुस्तीद्वारे रुजले होते. त्या घटनादुरुस्तीद्वारे निवडणुकीच्या माध्यमातून लोकांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींची सर्वोच्च अशी सोव्हिएत संसद अस्तित्वात यावयाची होती. त्यानुसार, यथावकाश तिथे निवडणुका होऊन

१९८९ साली सोव्हिएत संसद साकारली आणि सोव्हिएत संघराज्याच्या विघटनाची मुळे अंकुरण्यास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली ती तिथूनच. मात्र, या सगळ्या घटनाशृंखलेच्या बुडाशी असलेली कारणपरंपरा मात्र अशी एकरेषीय अजिबातच नाही. ती आहे व्यामिश्र आणि म्हणूनच गुंतागुंतीची. त्या कारणभूत घटकांचा नीट परिचय करून घेणे उद्‌बोधक ठरावे.

**विघटनामागील संमिश्र कारणपरंपरा**

समाजमनात व्यापक प्रमाणावर झिरपलेला बदलच व्यवहारात साकारत असतो. Perestroika आणि Glasnost या ज्या दोन नवसंकल्पनांचे ऐलान गोर्बाचेव्ह यांनी केले ते सोव्हिएत समाजमनाने काळाच्या त्या टप्प्यावर सर्वदूर स्वीकारले त्याची कारणे तत्कालीन सामाजिक-राजकीय-आर्थिक वास्तवात शोधावी लागतात. तिथे ती सापडतातदेखील.

संपूर्णतया केंद्रीय नियोजनप्रधान विकासप्रणालीचा अ-लवचीक अवलंब वर्षानुवर्षे करत राहिल्यामुळे सोव्हिएत अर्थव्यवस्थेमध्ये नाना प्रकारची जळमटे निर्माण होण्याबरोबरच उदंड अकार्यक्षमता ठायी ठायी बोकाळलेल्या होत्या. परिणामी, जीवनावश्यक जिनसांसाठी दुकानांसमोर लागणाऱ्या लांबलचक रांगा आणि चौफेर साठेबाजी हे तिथे नित्याचे होते. त्या हलाखीमध्ये भर पडली ती Perestroikaच्या अर्धवट अंमलबजावणीपायी. सोव्हिएत उद्योगव्यवसायांच्या ज्या प्रांतांत बाजारभावांवरील बंधने Perestroikaच्या अंगीकाराद्वारे विसर्जित झाली तिथे किंमतवाढ वेगाने पुढे सरकू लागली. त्यांतून सोव्हिएत नागरिकांना भाववाढीचा सामना करणे भाग पडू लागले. खनिज तेल आणि नैसर्गिक वायू या दोन नैसर्गिक ऊर्जास्रोतांच्याबाबतीत सोव्हिएत संघराज्य पूर्वीपासुनच संपन्न व म्हणून सुदैवी होते. १९७० तसेच १९८०च्या दशकांदरम्यान सोव्हिएत संघराज्याने आर्थिक आघाडीवर चांगल्यापैकी कामगिरी साध्य केली ती याच दोन ऊर्जासाधनांच्या निर्यातीद्वारे. त्या काळात इंधनांच्या वैश्विक बाजारपेठेमध्ये या दोन ऊ र्जास्रोतांचे बाजारभाव सातत्याने चढे राहिल्याने त्यांच्या निर्यातीद्वारे सोव्हिएत संघराज्याला आंतरराष्ट्रीय व्यापारात चांगल्यापैकी आधिक्य (surplus) मिळत राहिले.

परंतु, १९८०च्या मध्यापासून खनिज इंधनांच्या जागतिक बाजारपेठेतील वारे बदलू लागले. १९८०सालाच्या आसपास कच्च्या खनिज तेलाच्या प्रति बॅरलला १२० डॉलर असा मिळणारा घसघशीत बाजारभाव, गोर्बाचेव्ह यांनी सोव्हिएत संघराज्याचे सर्वोच्च नेतेपद स्वीकारण्याच्या सुमारास, म्हणजे १९८६ साली थेट

एका बॅरलला २४ डॉलरपर्यंत घसरला. आंतरराष्ट्रीय व्यापारात आधिक्य गाठीला बांधण्याच्या नेमक्या त्याच मुख्य स्त्रोताला कसर लागल्याने सोव्हिएत संघराज्याची एकंदर आर्थिक प्रकृतीच बिघडली.

केंद्रीय सत्तास्तरावर एकवटलेल्या सर्वंकष नियोजनप्रणालीच्या परिणामी सोव्हिएत अर्थव्यवस्था प्रदीर्घ काळ मरगळलेली होती. आर्थिक वाटचालीचा सरासरी वार्षिक वेग खुंटलेला, खुरटलेला होता. अर्थकारणाला तशी कुंठितावस्था आलेली असली तरी सोव्हिएत संघराज्याच्या संरक्षण व्यवस्थेवरील खर्चाला मात्र कोठेही कात्री लागलेली नव्हती, लावली जात नव्हती. त्याला कारण होते ते अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांनी प्रवर्तित केलेल्या अमेरिकेच्या संरक्षणविषयक महत्वाकांक्षी व्यूहरचनेचे. तसेही सोव्हिएत संघराज्याची संरक्षणावरील दरवर्षीची अंदाजपत्रकीय वित्तीय तरतूद १९७०च्या दशकापासूनच सतत चढती भाजणी दाखवत होती. सोव्हिएत संघराज्याच्या तत्कालीन ठोकळ उत्पन्नापैकी नेमका किती हिस्सा संरक्षणविषयक बाबींवर वेच केला जात होता, या संदर्भातील एकमुखी व अधिकृत आकडेवारी एका स्त्रोताद्वारे कधीच हाती आली नाही. परंतु, सोव्हिएत संघराज्याबाहेरील काही अर्थवेत्यांच्या मते सोव्हिएत संघराज्याच्या वार्षिक ठोकळ उत्पादितापैकी जवळपास १० ते २० टक्के इतका हिस्सा संरक्षणविषयक बाबींकडे वळवला जात असे. कुंठितावस्थेतील सोव्हिएत अर्थकारणाला चेतना पुरविण्यासाठी अनिवार्य असणारी पुंजी शासनसंस्थेपाशी त्यांमुळे नसावी, हे ओघानेच येते.

अमेरिकेबरोबरील स्पर्धेपायी संरक्षणाला सातत्याने दिल्या गेलेल्या झुकत्या मापाचा अकल्पित फटका बसत राहिला तो गोर्बाचेव्ह यांनी प्रवर्तित केलेल्या Perestroikaला. परंतु, तो तसा बव्हंशी अप्रत्यक्ष असल्यामुळे त्या संदर्भात प्रकर्षाने कोठेही चर्चा झडल्या नाहीत. पुनर्रचनेद्वारे खुल्या होत असलेल्या बाजारपेठीय अर्थकारणात नाविन्य, कल्पकता, नवसर्जन यांची सद्दी चालत राहते. ग्राहकांच्या बदलत्या आवडीनिवडी, खरेदीकडे असणारा त्यांचा कल, उत्पादनविषयक तंत्रज्ञानातील नवनवीन प्रवाह यांच्याशी निरंतरचा सुसंवाद हा खुल्या अर्थकारणाचा गाभा ठरत असतो. त्यासाठी प्रेरणा आणि प्रोत्साहन यांची घाऊक गरज असते ती नवशोधनाला, नवसर्जनाला, कल्पक उद्यमशीलतेला आणि संशोधनाला. संरक्षणावरच सारा झोत राहिल्याने अर्थकारणातील अन्य क्षेत्रांमधील संशोधन व विकासाची प्रक्रिया सातत्यशील राहावी याकडे सरसहा दुर्लक्षच केले गेले. नवशोधनाचा, उद्यमशीलतेचा, नवसर्जनाचा सारा प्रवाह एकवटलेला राहिला तो संरक्षणविषयक प्रांतांवरच. उमेदीचे सारे कल्पक

संशोधक, नवशोधक, सर्जनशील व नवीन काही तरी करून बघण्यातील जोखीम पत्करण्याची क्षमता व वृत्ती असणारे सोव्हिएत समाजव्यवस्थेतील सारे होतकरू संरक्षणविषयक प्रांतांमध्येच मग वळवले जात राहिले. Perestroikaद्वारे तिथे जागृत होऊ लागलेल्या खर्चाळू ग्राहकवृत्तीची त्यांपायी कुचंबणा होऊन लोकमानसामध्ये तत्कालीन अर्थविषयक प्रशासनासंदर्भातील असमाधान बळावू लागले. त्या असंतोषाचे पडसाद तेथील सामाजिक जीवनव्यवहारांत उमटणे मग अतिशय स्वाभाविक होते.

मुळात, केंद्रवर्ती नियोजनबद्ध अशा शासनसंस्थाप्रणित व्यवहारात, सोव्हिएत व्यवस्थेमध्ये ठायी ठायी उद्‌भवणाऱ्या तुटवड्यांना आणि त्यांचा अनुचित लाभ उठवत सर्वत्र बोकाळलेला काळा बाजार व भ्रष्टाचार यांना सर्वसाधारण सोव्हिएत नागरिक पुरते विटलेले होते. Glasnostच्या माध्यमातून एक नवीनच सळसळीने त्या विटलेल्या मनांवर फुंकर घातली. नाना प्रकारच्या नवसंकल्पना, कल्पना, आकांक्षा, अनुभव यांनी सोव्हिएत मन तरारले. सोव्हिएत माध्यमविश्वात नव्यानेच जम बसवत असलेल्या उदारमतवादी वृत्तपत्रादी माध्यमांवर नागरिकांच्या उड्या पडू लागल्या. पाश्चिमात्य जिनसांच्या दुकानांपुढेही सोव्हिएत नागरिक खरेदीसाठी रांगा लावू लागले. ३१ जानेवारी १९९० रोजी मॅकडोनल्ड्स् या जगविख्यात अमेरिकी ब्रॅन्डचे सोव्हिएत भूमीवर उमटलेले पहिलेवहिले पदचिन्ह म्हणजे सोव्हिएत मनोभूमीमध्ये अवतरत असलेल्या नवपर्वाची दृश्य झलकच होती.

सोव्हिएत संघराज्याचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री एदुआर्द शेवर्द्नात्झे यांना नवप्रेरणा जागलेल्या जनमानसाची व त्याच्या बदलत्या अपेक्षांची चाहूल अचूक लागलेली होती. कुंठित अर्थकारण हे आतून पूर्णपणे सडलेल्या राजकीय व्यवस्थेचे केवळ भौतिक आविष्करण आहे; मुदलात परिवर्तन तिथेच घडवून आणणे अनिवार्य बनलेले आहे, अशा आशयाचे उद्गार शेवर्द्नात्झे यांनी गोर्बाचेव्ह यांच्यापाशी एकदा काढले होते. नवप्रेरणांनी फुललेले सोव्हिएत जनमानस आणि जुन्यापुराण्या, कालबाह्य धारणांना उराशी कवटाळून बसलेली राजकीय तसेच प्रशासकीय चौकट यांच्यामध्ये प्रथम विसंवादाच्या आणि यथावकाश संघर्षाच्या ठिणग्या उडाव्यात हे अगदी स्वाभाविकच होते. तेच नेमके १९९१ साली घडले!

■■

# चीन - पूर्वरंग

## बंदिस्त चौकट आणि मुक्त नवप्रेरणा

चिनी अर्थव्यवस्थेतील पुनर्रचना पर्वाची पायाभरणी १९७८-७९ साली घडून आल्यानंतर बरोबर १० वर्षांनी बीजिंगमधील तिआनमेन चौकात उग्र जनांदोलन उभे राहावे, हे अनेकार्थांनी लक्षणीय ठरते. ते आंदोलन फार विचारांती उत्क्रांत झालेले होते अशातील भाग मुळीच नाही. चिनी अर्थव्यवस्थेत अतिशय मूलभूत व सर्वंकष बदल घडवून आणण्याबरोबरच चीनमध्ये राजकीय सुधारणादेखील राबविण्याबाबत सदैव आग्रही राहिलेले चिनी नेते Hu Yaobang यांच्या अंत्यसंस्कारांच्या दिवशी त्यांच्या निधनाबाबत शोकभावना व्यक्त करत त्यांना आदरांजली वाहण्यासाठी एकत्रित जमा होण्याचे निमित्त आंदोलनाच्या व्यापक प्रकटीकरणास पुरेसे ठरले. परंतु, ते होते केवळ तात्कालीक कारण. चिनी व्यवस्थेत फैलावलेल्या सर्वस्तरीय भ्रष्टाचाराबाबतची चीड, आर्थिक सुधारणांना अधिक वेग देण्याबाबतच्या मागणीला शासकांकडून मिळणाऱ्या निरुत्साही व धीम्या प्रतिसादाबद्दल तरू णाईच्या मनात दाटलेला असंतोष, महागाईच्या काचापायी बसणारा आर्थिक चिमटा... अशांसारख्या विविध कारणांपायी अस्वस्थ व असमाधानी असलेल्या चिनी मनाला ती घुसमट व्यक्त करण्यासाठी काही तरी निमित्तच हवे होते.

प्रदीर्घ काळ बंदिस्त राखलेल्या कोणत्याही व्यवस्थेची पुनर्रचना घडवून आणण्यास सुरु वात केली की यथावकाश ती प्रक्रिया स्वयंप्रेरक बनते. बऱ्याच अंशी, मग, तिच्या प्रवासाची पुढील दिशा ती स्वत:च निर्धारित करत राहते. पुनर्रचनेच्या प्रवर्तकांनी ज्या उद्देश्याने तिला हात घातलेला असतो त्यांनी मनाशी रेखाटलेल्या मार्गानेच तिची आगेकूच होत राहील, याची तंतोतंत हमी कोणीच देऊ शकत नसते. इतकेच केवळ नाही तर, पुनर्रचना प्रक्रियेची गती आणि वाटचाल नियोजित चाकोरीमधून होत नसेल तर तिला आपल्या धोरणदृष्टीनुसार वळण देण्यासाठी प्रसंगी हस्तक्षेप करणेदेखील राजकीय प्रक्रियेतील धुरिणांना अजिबात सोपे ठरत नाही. चीनमध्येदेखील घडले ते नेमके हेच.

आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या अंगीकारानंतर बदललेल्या सर्वंकष पर्यावरणापायी व्यक्तिगत तसेच सामाजिक स्तरावर निर्माण झालेल्या नवप्रेरणांना पुरेसा व अपेक्षित वाव मिळत नसल्याने सर्वसाधारण चिनी मानसामध्ये दाटलेल्या असमाधानाचे तिआनमेन चौकात प्रगट झालेल्या उस्फूर्त आविष्कारामागील कार्यकारणभावाचे विविध कंगोरे जाणून घेण्यापूर्वी, चिनी पुनर्रचनेची पायाभरणी करणाऱ्या धुरिणांची जडणघडण, व्यक्तिमत्व विशेष आणि परस्परांशी त्यांचे असलेले कार्यकारी स्वरूपाचे नातेसंबंध यांचा आलेख समजावून घेणे आवश्यक ठरते. Deng Xiaoping, Hu Yaobang आणि Zhao Ziyang या तीन व्यक्तिमत्वांचे तपशीलवार आकलन, म्हणूनच, प्रथम करू न घ्यावयास हवे.

चीनमधील सिच्युआन प्रांतात १९०४ सालातील ऑगस्ट महिन्यात डेंग झिआओपिंग यांचा जन्म झाला. चिनी राष्ट्र आणि चिनी समाजाच्या जीवनप्रवासादरम्यानचे 'मानखंडणामय शतक' असे ज्या कालखंडाचे वर्णन केले जाते त्या दरम्यानच डेंग यांनी चिनी भूमीवर पहिला श्वास घेतला. चिनी बंदरे आणि चिनी बाजारपेठांवर अतिक्रमणाद्वारे बुभुक्षित अशा पश्चिमी राष्ट्रांचा संपूर्ण कबजा प्रस्थापित झालेला तो सगळाच कालखंड मानहानी, अवहेलना आणि घुसमट या तीन भावना–जाणिवांचा अमिट ठसा सर्वसाधारण चिनी मानसिकतेवर उठवून गेला. १९११ साली चिनी राजवंशातील अखेरच्या राजकुमाराची गच्छन्ती घडवून आणत चिनी लष्कराने चीनमध्ये प्रजातंत्राची घोषणा केली आणि एका नवीन जीवनाध्यायाची पाने चिनी समाजजीवनामध्ये उघडली गेली. नव्याने पदरव उमटवत आलेला तो कालखंडही काही सुरळीत व सुखावह नव्हताच. दुष्काळ, यादवी आणि कमालीची अस्थिर केंद्रीय सत्ता यांनी समाजजीवन त्या वेळी पूर्णपणे गजबजलेले होते. गरिबी आणि त्यापायी निपजणारा सामाजिक ताणतणाव त्या काळात चीनमध्ये नांदत राहिला.

काळाने मन:पटलावर उमटवलेल्या त्याच प्रतिमा बाळगत डेंग यांनी शिक्षणासाठी १९२० साली फ्रान्सला प्रयाण केले. पाश्चिमात्यांकडून केल्या जाणाऱ्या चिनी नागरिकांच्या अवहेलनेचे कडवट घोट डेंग यांनाही फ्रान्समधील त्यांच्या वास्तव्यादरम्यान गिळावे लागले. ''पश्चिमी भांडवलशाहीवाद्यांकडून चिनी नागरिकांच्या पदरात पदोपदी घातल्या जाणाऱ्या अवमानपूर्वक वागणुकीचा अमिट असा ठसा फ्रान्समधील त्या वास्तव्यादरम्यान माझ्या अंत:करणावर उमटला'', असे उद्‌गार डेंग यांनी पुढे एका प्रसंगी बोलताना काढले. पश्चिमी सत्तांनी लादलेल्या अवमानकारक अस्तित्वाच्या जोखडाखालून चीनला मुक्त करायचे एवढेच केवळ

नव्हे तर चीनचा पूर्वगौरव त्याला पुनश्च एकवार प्राप्त करून द्यावयाचा या निर्धाराचे बीजारोपण डेंग यांच्या मनोभूमीमध्ये त्याच साऱ्या मानसिक उलघालीदरम्यान घडून आले असले पाहिजे, असे त्यांच्या चरित्रकारांचे विश्लेषण सांगते.

फ्रान्समधील वास्तव्यादरम्यान डेंग यांचा चौ एन लाय यांच्याशी परिचय घडून आला होता. फ्रान्समधून परतल्यानंतर, पुढे, १९२४ साली चिनी कम्युनिस्ट पक्षाशी डेंग यांचा अनुबंध जमून आला. डेंग यांच्या ठायी वसणारे संघटनकौशल्य अल्पावधीतच पक्षाच्या नेतृत्वाच्या नजरेत भरले. यथावकाश, चैंग के शेक यांच्याविरु द्धच्या संघर्षामध्ये सहभाग घेण्यापूर्वी डेंग सोव्हिएत रशियालादेखील भेट देऊ न आलेले होते. माओ झेडॉन्ग यांच्या 'लॉन्ग मार्च'मध्ये सहभाग घेतल्यानंतर चिनी राजकीय तसेच सामाजिक जीवनातील डेंग यांचा सहभाग अधिकच सघन बनला. चैंग के शेक तैवानमध्ये विजनवासात गेल्यानंतर पालटलेल्या परिस्थितीत चीनमधील राजकीय व्यवस्थेमध्ये डेंग यांचा प्रवेश होणे हे अतिशय स्वाभाविक होते. अंगभूत गुणांच्या बळावर डेंग यांनी कम्युनिस्ट पक्षाच्या अधिकारश्रेणीमध्येही लौकरच भरारी घेतली. चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिटब्यूरोचे सभासदत्व त्यांना प्राप्त झाले त्या वेळी डेंग हे अवघ्या ४२ वर्षांचे होते.

प्रथम जपान आणि नंतर चैंग के शेक यांच्याविरू द्धच्या संघर्षादरम्यान सन १९३६ ते १९४९ या चौदा वर्षांदरम्यान चिनी लष्कराचा संपादन केलेला विश्वास डेंग यांच्या पुढे कामी आला. त्या लष्करी कारकिर्दीदरम्यानच डेंग यांचा अनुबंध आणखी दोन हस्तींशी घडून आला. Zhao Ziyang आणि Hu Yaobang ही ती दोन व्यक्तिमत्वे. योगायोगाचा भाग असा की, पुढे १९८९ साली तिआनमेन चौकात आक्रमकपणे प्रगटलेल्या चिनी सर्वसामान्यांच्या आंतरिक अस्वस्थतेची पायाभरणी तसेच हाताळणी या दोहोंशी या दोन्ही व्यक्तिमत्वांचा निकट संबंध होता व राहिलाही. त्यांमुळे, या डेंग यांच्या या दोन सहकाऱ्यांसंदर्भात अधिक जाणून घेणे या ठिकाणी उपयुक्त ठरावे.

एका अतिशय सामान्य शेतकरी कुटुंबात Hu Yaobang यांचा जन्म १९१५ सालातील नोव्हेंबर महिन्यात झाला. वयाच्या १८व्या वर्षी, म्हणजे, १९३३ सालीच चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या युवक आघाडीचे सदस्यत्व त्यांनी घेतले. पुढे, जपानविरुद्धच्या युद्धादरम्यान डेंग यांचे सहकारी म्हणून तसेच चैंग के शेक यांच्याविरुद्धच्या संघर्षातही Hu Yaobang हे डेंग यांचे मदतनीस म्हणून कार्यरत होते. १९५२ साली चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या युवक आघाडीचे प्रमुख या नात्याने त्यांनी डेंग यांच्याबरोबर काम सुरू केले. डेंग यांचे विश्वासू असा Hu Yaobang

यांचा लौकिक प्रस्थापित झाला तो याच साऱ्या प्रक्रियेद्वारा. त्यांमुळेच, चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिटब्यूरोचे प्रमुख म्हणून डेंग यांनी १९७८ साली त्यांची नियुक्ती केली. तर, चिनी कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव म्हणून Hu Yaobang यांना पुढे १९८० साली बढती मिळाली ती डेंग यांचा संपूर्ण विश्वास त्यांनी संपादन केलेला असल्यामुळेच.

चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या युवक आघाडीमध्ये Hu Yaobang यांच्या आगेमागेच प्रवेश केलेल्या Zao Ziyang यांची पार्श्वभूमी मात्र Hu Yaobang यांच्यापेक्षा पूर्णपणे निराळी होती. चीनमधील उच्चभ्रू जमीनदाराच्या कुळामध्ये जन्म झालेल्या Zao Ziyang यांनी चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या युवक आघाडीमध्ये सहभाग घेतला तो १९३२ साली. आर्थिक पुनर्रचनांसंदर्भात Zao Ziyang यांनी केलेल्या काही प्रयोगांद्वारे त्या प्रांतातील त्यांच्या ठायीची क्षमता व कौशल्य नजरेत भरल्यामुळेच डेंग यांच्या निकटवर्ती सहकाऱ्यांमध्ये त्यांचा समावेश यथावकाश घडून आला. चीनमधील Guangdong या प्रांतातील चिनी कम्युनिस्ट पक्षाचे चिटणीस म्हणून १९६५ साली कार्यरत असताना शेतीसुधारणांवर Zao Ziyang यांनी तिथे भर दिला. खास करून शेतीची उत्पादकता वाढवण्याबाबत त्यांनी खास प्रयत्न केले. तर, पुढे कम्युनिस्ट पक्षाचे Sichaun प्रांतातील चिटणीस म्हणून काम बघत असताना Zao Ziyang यांनी शेती आणि उद्योग अशा दोन्ही क्षेत्रांतील सुधारणांना हात घातला. व्यवसायाद्वारे कमावलेल्या नफ्याचा काही हिस्सा धंद्यातील पुनर्गुंतवणुकीसाठी आणि/अथवा कर्मचाऱ्यांना बोनस देण्यासाठी राखून ठेवण्यास खासगी उद्योगांना Zao Ziyang यांनी तिथे परवानगी दिली. खासगी क्षेत्रातील लघुउद्योगांना बँकांमार्फत कर्जपुरवठा केल्या जाण्याच्या सुविधेचाही प्रारंभ त्यांनी तिथे घडवून आणला. खासगी उद्योगांना उत्पादनासंदर्भात काही एक ठरावीक 'कोटा' चिनी शासन त्या काळात नेमून देत असे. उद्योगांनी त्या पेक्षा अधिक मात्रेने केलेले उत्पादन खुल्या बाजारात विकण्याची परवानगी देण्याचे पाउलही Zao Ziyang यांनी Sichuan मधील त्यांच्या कारकिर्दीत उचलले.

माओ झेडॉन्ग हे त्या वेळी चीनचे सर्वोच्च नेते होते. डेंग यांनी माओंचे नेतृत्व सर्वस्वी स्वीकारलेले होते. सर्वोच्च नेतृत्वाशी काही बाबतींत तात्त्विक मतभेद असले तरी त्यांचा प्रगट उच्चार करावयाचा नाही, हे डेंग यांचे धोरण होते. अर्थकारणविषयक माओ यांच्या काही धोरणांबाबत साशंकता असूनही डेंग यांनी त्यांबाबत मौनच पत्करले. राजकीय बाबतींत मात्र चिनी कम्युनिस्ट पक्ष हेच डेंग यांचे सर्वस्व होते व

ते जीवनभर तसेच राहिलेदेखील. वयाच्या ऐन चाळीशीत लाभलेल्या सत्ताकाळादरम्यानच डेंग यांच्या अर्थविकासविषयक धारणा-संकल्पना आणि राजकीय श्रद्धा यांचे दृढीकरण घडून आले. राजकीय व्यवस्थेमध्ये निर्णायक सत्ता प्राप्त झाल्यानंतर १९७८ साली चिनी आर्थिक पुनर्रचनेचे डेंग यांनी जारी केलेले ऐलान आणि १९८९ साली तिआनमेन येथे प्रगटलेल्या चिनी लोकमानसाच्या उद्रेकी आविष्काराची त्यांनी केलेली कठोर हाताळणी या दोहोंचीही बीजे डेंग यांच्या ठायी क्रमाने साकारलेल्या त्या दृढीकरणातच रु जलेली आढळतात, असे अभ्यासकांचे प्रतिपादन आहे.

चिनी कम्युनिस्ट पक्षाशी सर्वथैव व सर्वंकष बांधिलकी हा डेंग यांच्या व्यक्तिमत्वाचा आणि पर्यायाने कार्यपद्धतीचा गाभा राहिला. पक्षांतर्गत लोकशाहीसंदर्भातील डेंग यांची संकल्पना विलक्षण सुस्पष्ट होती. विचारांच्या पक्षांतर्गत मुक्त प्रगटीकरणास त्यांचा विरोध नव्हता. परंतु, त्याच वेळी विचारांच्या आधारे पक्षामध्ये मूळ धरणाऱ्या गटबाजीस मात्र त्यांचा कडवा विरोध होता व तो कायम राहिला. पक्षामध्ये गटकारणाला अजिबात थारा मिळता कामा नये याबाबत कटाक्ष बाळगणाऱ्या डेंग यांची कार्यपद्धती काटेकोर श्रमविभागणीवर आधारलेल्या सांघिक नेतृत्वाच्या माध्यमातून चिनी कम्युनिस्ट पक्षाचा गाडा हाकण्याची होती. लोकशाही आचार-विचारपद्धतीचे डेंग यांना पुरते वावडे होते असे नाही. परंतु, पक्षाने निर्धारित करून दिलेल्या सीमांमध्येच लोकशाहीचा वाव बंदिस्त असेल, यांबाबत ते विलक्षण सावध व कठोर राहिले. चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या एका व्यासपीठावर ६ फेब्रुवारी १९६२ या दिवशी केलेल्या भाषणादरम्यान पक्षसंलग्न या आपल्या राजकीय भूमिकेबाबत डेंग यांनी अतिशय नि:संदिग्ध प्रतिपादन केले.

चीनच्या अर्थविकासविषयक आपल्या भूमिकेचे सूचन डेंग यांनी घडविले ते त्यानंतर अवघ्या पाचच महिन्यांनी, म्हणजे, ७ जुलै १९६२ या दिवशी आयोजित कम्युनिस्ट पक्षाच्या युवक आघाडीच्या एका मेळाव्यास संबोधित करतेवेळी. चीनला भेडसावत असणाऱ्या आर्थिक समस्यांचे निराकरण घडवून आणायचे तर प्रथम लक्ष केंद्रीत करावयास हवे ते शेतीच्या उत्पासनव्यवस्थेचे सक्षमीकरण साधण्यावर, हा डेंग यांच्या प्रतिपादनाचा त्या वेळी केंद्रबिंदू राहिला. त्यासाठी प्रथम लक्ष दिले गेले पाहिजे ते शेतीक्षेत्राचे उत्पादन वाढविण्यावर, असे ठाम प्रतिपादन डेंग यांनी त्यांच्या विवेचनादरम्यान केले. या आघाडीवर अपयश आल्यास औद्योगीक आघाडीवरील भरीव कामगिरीची आशा आपण सोडलेलीच बरी, असे विलक्षण सुस्पष्ट विश्लेषण डेंग यांनी त्या व्यासपीठावरून केले. चिनी उद्योगक्षेत्राच्या आधुनिकीकरणाचा पाया

हा चिनी शेतीच्या पुनरुत्थानाद्वारेच घातला गेला पाहिजे, यांबाबत डेंग हे प्रथमपासूनच कमालीचे स्पष्ट व दक्ष होते. मात्र, या सगळ्या सुधारणा व बदल हे चिनी कम्युनिस्ट पक्षाचे सर्वोच्च स्थान व सत्ता अबाधित राखतच घडवून आणले गेले पाहिजेत, याबाबत डेंग ठाम होते.

आर्थिक सुधारणांची गती सातत्यशील राखत असतानाच, बदलत्या सामाजिक भावना-प्रेरणांचे व्यवस्थापन कसे घडवून आणावे, यांबाबत खुद्द चिनी कम्युनिस्ट पक्षातच दोन गट होते. सुधारणापर्वादरम्यान चिनी कम्युनिस्ट पक्षाची सर्वंकष पकड बदलत्या वाऱ्यांपायी कोठेही अणुमात्रदेखील ढिली होता कामा नये, यांबाबत पक्षातील एक गट कमालीचा आग्रही होता. खुद्द डेंग यांची भूमिकादेखील तीच होती. कम्युनिस्ट पक्ष आणि त्याची प्रतिष्ठा व सत्ता सर्वोच्च व अंतिम हे सूत्र डेंग यांनी जीवनभर कसोशीने जपले. त्याच वेळी, डेंग यांचे प्रदीर्घ काळचे घनिष्ठ व पक्षातील त्यांचे एक विश्वासू सहकारी Hu Yeobang यांची भूमिका मात्र डेंग यांच्यापेक्षा गुणात्मकरीत्या प्रथमपासूनच वेगळी होती.

आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या जोडीनेच चीनमध्ये लोकशाहीपूरक सुधारणादेखील घडून याव्यात हा त्यांचा सततचा आग्रह होता व राहिला. वास्तविक पाहता, चिनी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस या महत्वाच्या पदावर Hu Yeobang यांची नियुक्ती डेंग यांचे ते निकटवर्ती विश्वासू असल्यामुळेच १९८० सालीच करण्यात आलेली होती. आर्थिक सुधारणा आणि लोकशाहीवादी सुधारणा यांचे साहचर्य टिकवून धरण्याबाबतचा Hu Yeobang यांचा आग्रह डेंग यांना चांगल्यापैकी ठाऊक होता. चिनी अर्थकारणाच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी अनिवार्य असणाऱ्या आर्थिक सुधारणा व धोरणात्मक फेरबदल घडवून आणण्याबाबत दोघांचेही एकमत होते. परंतु, अनिवार्य ठरणारे अर्थधोरणविषयक बदल अंमलात आणत असतानाच चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या सर्वोच्च नियंत्रणाची पकड कोठेही तसुभरदेखील कमी होता कामा नये, यांबाबत डेंग यांची भूमिका कमालीची कणखर व अ-लवचीक होती. त्यांमुळे, आर्थिक सुधारणांच्या जोडीनेच चीनमध्ये लोकशाहीपूरक राजकीय सुधारणादेखील घडवून आणाव्यात हा Hu Yeobang यांचा आग्रह डेंग यांनी काही एका मर्यादेपर्यंत मानला अथवा सहन केला.

साधारणपणे १९८५ च्या सुरुवातीस चीनमधील आर्थिक पर्यावरण एका महत्वाच्या वळणावर येऊन ठेपले. आर्थिक पुनर्रचना पर्वाच्या पहिल्या पर्वात जारी केलेल्या शेतीविषयक सुधारणांचे लाभ त्या दरम्यान सर्वोच्च पातळीवर पोहोचलेले होते.

कमाल मर्यादा गाठली गेल्यामुळे त्यांबाबत पुढे अधिक काही करण्याने शेतीमध्ये आणि पर्यायाने ग्रामीण चीनमध्ये अधिक भरीव असे काही हाताला लागण्यासारखे नव्हते. त्या दरम्यान चीनमधील शहरी विभाग मात्र तुलनेने उपेक्षित राहिलेले होते. त्या परिस्थितीत, Hu Yeobang आणि Zao Ziyang यांनी चीनच्या नागरी भागांतसंदर्भातील सुधारणा लागू करण्याबाबत प्रस्ताव पक्षापुढे मांडला व त्यांबाबत आग्रह धरला. शहरी बाजारपेठांमधील मागणी व पुरवठ्याचे तौलनिक चित्र बाजारपेठीय किमतींच्या माध्यमातून वास्तवदर्शी पद्धतीने प्रगट व्हावे, यासाठी आवश्यक त्या सुधारणांचा अंगीकार केला जावा, असा त्या दोघांचा आग्रह होता. चिनी कम्युनिस्ट पक्षामध्ये त्यांबाबत एकमत नव्हते. तशा परिस्थितीमध्ये मग, पक्षामध्ये गटबाजी माजू नये म्हणून 'आस्ते कदम' आणि 'जैसे थे' या जोडमंत्रांची आळवणी डेंग यांनी धोरणीपणे आलटून-पालटून चालू ठेवली. परंतु, त्या बाबतीत काहीसा धीमा पवित्रा स्वीकारतील तर ते Hu Yeobang कसले! आर्थिक सुधारणांच्या जोडीनेच राजकीय सुधारणादेखील कार्यान्वित कराव्यात ही भूमिका Hu Yeobang उत्तरोत्तर अधिकाधिक आग्रहपूर्वक व आक्रमकपणे पुढे रेटू लागले. केवळ इतकेच नाही तर, राजकीय सुधारणांबाबत चिनी समाजातील बुद्धीजीवींनी व्यापक चर्चाविश्व उभे करावे, यांबाबत ते पाठपुरावा करू लागले.

बघायला गेले तर आर्थिक सुधारणांना राजकीय क्षेत्रातील सुधारणांची जोड देण्याबाबत डेंग यांची भूमिका पूर्णपणे प्रतिकूल होती, असे अजिबातच नाही. या मुद्याबाबत चिनी कम्युनिस्ट पक्षामध्ये दोन विचारप्रवाह त्या वेळी नांदत होते. आर्थिक सुधारणांच्या सुरळीत आगेकूचीची हमी ज्या राजकीय सुधारणा देतील अथवा ज्या राजकीय सुधारणांचा अवलंब केल्याने आर्थिक पुनर्रचना पर्वाची वाटचाल विनाविघ्न चालू राहील, अशा राजकीय सुधारणांचा अंगीकार करण्याबाबत पक्षातील एक गट अनुकूल होता. डेंग यांची भूमिकाही नेमकी तीच होती. तर, राजकीय सुधारणांच्या प्रवर्तनाद्वारे चीनमध्ये लोकशाही राज्यप्रणालीची निर्मिती व्हावी, अशी पक्षांतर्गत दुसऱ्या गटाची प्रेरणा व भूमिका होती. साहजिकच, Hu Yeobang हे या गटात सक्रिय होते. डेंग आणि Hu Yeobang या दोघांच्या भूमिकांचा संघर्षबिंदू नेमका इथेच होता. वाटेल ते झाले तरी चिनी कम्युनिस्ट पक्षाची प्रभुसत्ता सर्वोच्च व अंतिम ही डेंग यांची जीवननिष्ठा कायम होती. परिणामी, 'बूर्ज्वा' विचारसरणी, लोकशाही आणि पाश्चात्य धर्तीची भांडवलशाही या बाबी पक्षीय धोरणांशी विसंगत होत, यांबाबत डेंग ठाम होते. स्वातंत्र्य आणि लोकशाही या मूल्यांचा स्वीकार पक्ष

निश्चित करील त्या मर्यादेत व तेवढ्याच हद्दीत होईल या भूमिकेवरून तसूभरदेखील ढळायला डेंग तयार नव्हते.

सूक्ष्मपणे बघितले तर एक विलक्षण द्वंद्व इथे दडलेले होते. नियोजित अर्थकारणामध्ये शासनसंस्थेचे अर्थव्यवहारांवर असलेले नियंत्रण आणि सर्व प्रकारच्या मुक्त अर्थव्यवहारांना खुला वाव देणारी बाजारपेठीय व्यवस्था या दोन संस्थांच्या परस्परसाहचर्याचा तोल कसा सांभाळायचा हे ते मूलभूत द्वंद्व होय. चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या वरिष्ठ निर्णयव्यवस्थेमध्ये नेमक्या याच द्वंद्वापायी दोन तट निर्माण झाले. केवळ इतकेच नाही तर त्या दोन तटांमध्ये तंटाही उभा राहिला. नियोजनप्रधान अर्थव्यवस्थेमध्ये कार्यरत असलेल्या खासगी क्षेत्रावर नियोजनाच्या माध्यमातून शासनसंस्थेची पकड राहते. साहजिकच ती सत्ता सोडून द्यायला शासनसंस्था सहजासहजी तयार होऊ नये हे स्वाभाविक ठरते. खुल्या बाजारपेठीय व्यवहारांचा आग्रह धरणारे घटक आणि नियोजनाच्या माध्यमातून अर्थकारणावरील पकड ढिली करण्यास तयार नसलेले शासनसंस्थेतील घटक यांच्यादरम्यान विसंवाद उद्‌भवावा यात नवल काहीच नसते. डेंग यांना पक्षांतर्गत नेमक्या त्याच विसंवादाला तोंड द्यावे लागले ...आणि तिआनमेन चौकात १९८९ साली उफाळून आलेल्या असंतोषाची रुजवण नेमक्या याच पेचात होत राहिली.

परंतु मुळात, चिनी अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करण्याची निकड डेंग यांना वाटण्यापर्यंत चीनची वाटचाल केव्हापासून व कशी होत गेली याचा मागोवा घेणे या टप्प्यावर उद्‌बोधक आणि तितकेच आवश्यकही ठरते.

■■

# चीन - उत्तरंग

## धगधगता चौक आणि अभेद्य भिंत...

चीन आणि अमेरिकेदरम्यान, १९४९ सालांनंतर पुऱ्या दोन दशकांनी म्हणजे, १९७९ साली राजनैतिक संबंध औपचारिकरीत्या पुनर्प्रस्थापित झाले. चैंग कै शेक यांची चीनमधील प्रजातंत्रात्मक सत्ता माओ यांच्या नेतृत्वाखालील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी चिनी शेतकऱ्यांच्या पाठबळावर १९४९ साली उधळून लावल्यानंतर चैंग कै शेक तैवानमध्ये आश्रय घेते झाले. त्या विजनवासादरम्यानच चैंग कै शेक यांनी तिथे चिनी लोकसत्तात्मक सरकारची स्थापना केली. त्या सरकारला अमेरिकेच्या तत्कालीन नेतृत्वाने पाठिंबा दर्शविल्यामुळे चीन आणि अमेरिका यांच्यादरम्यानचे राजनैतिक संबंध गोठले गेले. उभय देशांमधील राजनैतिक संबंधांचा पोत पालटत असल्याचा प्रत्यय जागतिक समुदायाला त्या नंतर आला तो ६ एप्रिल १९७१ या दिवशी अमेरिकी टेबल टेनिस पटूंच्या चमूने चिनी भूमीवर पाऊल ठेवले तेव्हा. त्या नंतर अवघ्या तीनच महिन्यांनी, म्हणजे, १९७१ सालातील एप्रिल महिन्यात अमेरिकेचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री हेन्री किसिंजर यांनी चीनला गुप्त भेट दिली. किसिंजर यांच्या त्या गुप्त भेटीनंतर सहा महिन्यांनी, म्हणजे, १९७२ सालातील फेब्रुवारी महिन्यात अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी चीनला भेट दिली. त्या भेटीदरम्यान माओ आणि चौ एन लाय या दोघांबरोबर रिचर्ड निक्सन यांच्या झडलेल्या चर्चांद्वारे दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंध सुधारण्याच्या प्रक्रियेची पायाभरणी घडून आली.

पुढे १९७९ साली अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जिमी कार्टर यांनी अमेरिका-चीन राजनैतिक संबंधांवर अधिमान्यतेची मोहोर उमटविली आणि नंतर लगेचच चीनचे त्या वेळचे दुसऱ्या क्रमांकाचे नेते डेंग झिआओ पिंग यांनी अमेरिकेला भेट दिली. अगदी माओ यांच्या काळापासूनच चिनी अर्थकारणाच्या वाटचालीबाबत पूर्णपणे निराळी भूमिका असणाऱ्या डेंग यांना पश्चिमी राष्ट्रांनी आणि मुख्यत: अमेरिकेने अत्याधुनिक तंत्रशास्त्राधारित आर्थिक विकासाच्याबाबतीत किती मोठी

आघाडी प्रस्थापित केलेली आहे, याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांच्या भेटीदरम्यान आला असला पाहिजे. चिनी अर्थव्यवस्थेत अनिवार्य असणाऱ्या पुनर्रचनेची निकड डेंग यांना त्या भेटीद्वारे प्रकर्षाने जाणवलेली असावी, असा कयास बांधण्यास अवकाश आहे.

माओ यांचे ९ सप्टेंबर १९७६ या दिवशी निधन झाल्यानंतर १० महिन्यांनी कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीचे उपाध्यक्ष म्हणून २२ जुलै १९७७ रोजी डेंग यांची नियुक्ती झाली. पुढे १९७८ साली चीनची सत्ता हाती आल्यानंतर डेंग यांनी आर्थिक पुनर्रचनेला गती दिली. केवळ इतकेच नाही तर, चीनच्या परराष्ट्र धोरणाचेदेखील त्यांनी पुनर्लेखन घडवून आणले. बाह्य जगात चीनच्या तिथवर प्रस्थापित झालेल्या प्रतिमेची प्रथम डागडुजी आणि त्या नंतर रंगरंगोटी करण्यालाही डेंग यांनी हात घातला व ते कामही तडीस नेले. चीनच्या सत्तापटावर डेंग यांचे आगमन होण्यापूर्वी चिनी परराष्ट्रधोरण सोव्हिएत रशिया आणि अमेरिका या दोन टोकांदरम्यान हिंदकळत राहिले होते व राहत असे. अमेरिकेबरोबर १९७९ साली तर सोव्हिएत रशियाबरोबर १९८९ साली राजनैतिक संबंध सुधारून डेंग यांनी त्यांच्या चाणाक्ष मुत्सद्देगिरीचे दर्शन घडवले. चिनी पुनर्रचना कार्यक्रमाच्या कार्यवाहीदरम्यान ही सारी पुंजी डेंग यांच्या कामी आली.

चिनी अर्थव्यवस्थेने १९७८-७९ ते १९८९ या दशकभरादरम्यान ज्या जबरदस्त सरासरी वार्षिक दराने आगेकूच जारी राखली त्यांपायी चिनी नागरिकांचा आर्थिक स्तर उंचावला एवढेच केवळ नव्हे तर त्यांच्या जाणिवादेखील व्यापक व तरल बनल्या. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाद्वारे चिनी जीवनशैलीमध्ये प्रवेशलेल्या उदार वातावरणाद्वारे परदेशी कल्पना, जीवनपद्धती, मूल्यचौकट, विचारविश्व, जीवनस्तर अशांसारख्या विविध बाबींचा परिचय चिनी समाजमनाला घडून येऊ लागला. अमेरिकी कंपन्यांनी चिनी भूमीवर स्थापन केलेले उद्योग, परकीय भांडवलाच्या हातात हात घालून येणारे नवतंत्रज्ञान, त्या माध्यमातून बिगर चिनी जनसमूहांशी प्रस्थापित होऊ लागलेला संपर्क या सगळ्यांपायी चिनी नागरिकांच्या मनाचा पोत पालटू लागला.

**नवप्रेरणांचा वाढता दबाव व रेटा**

आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या तामिलीची परिणती, साहजिकच, सधन अशा नवसमृद्ध चिनी मध्यमवर्गाच्या निर्मितीमध्ये घडून आली. १९८०च्या दशकातील चिनी मनोविश्व, त्यांमुळे, नानाविध प्रवाह-प्रेरणांनी गजबजताना दिसू लागले. शास्त्रज्ञ, अभ्यासक, संशोधक यांसारख्या बुद्धिजीवी समाजघटकांनी राजकीय जीवनात अधिक

सक्रिय भूमिका बजावावी, असा विचारप्रवाह १९८०च्या दशकाच्या मध्यास चिनी शासकांच्या विचारविश्वात अंकुरत होता. या समाजघटकांना त्या दिशेने सक्रिय होण्याबाबत शासनसंस्थेने त्या काळात प्रोत्साहनदेखील दिले. किंबहुना, चिनी राजकीय सुधारणांबाबत नेमक्या याच समाजघटकांनी अधिक व्यापक स्तरावरील चर्चाविश्व उभे करावे, असा आग्रह Hu Yeobang सतत धरत राहिले. त्याच मुद्यावरून पक्षातील विरोधकांशी असलेल्या त्यांच्या विसंवादादरम्यान संघर्षाच्या सतत ठिणग्याही उडत होत्या. त्याच वेळी दुसरीकडे, मुख्यत: विद्यापीठीय विद्यार्थ्यांच्या मनोभूमीमध्ये राजकीय तसेच आर्थिक सुधारणांविषयक प्रेरणादेखील मूळ धरत होत्या. शिक्षणाची ताकद आणि ज्ञानाचे सामर्थ्य विद्यार्थ्यांच्या त्या पिढीला उमगलेले होते. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या तामिलीद्वारे राजकीय–सामाजिक स्वातंत्र्याची चव काही प्रमाणात चाखलेली असल्यामुळे नवीन राजकीय विचारांच्या रुजवणीस अनुकूल अशी मनोभूमी त्या पिढीच्या मनात तयार झालेली होती. व्यक्तिगत स्तरावर अधिक स्वातंत्र्य व मोकळीक मिळावी, अशी मनोभूमिका विद्यार्थीवर्गामध्ये वेगाने मूळ धरत होती. १९८६ सालातील साधारणपणे डिसेंबर महिन्याच्या सुमारास विद्यापीठांमध्ये विद्यार्थी संघटनांच्या निवडणुकांचे आयोजन करण्यात यावे, अशा प्रकारचा प्रस्ताव चर्चेमध्ये आला. परंतु, चिनी कम्युनिस्ट पक्षातील उच्चपदस्थांकडून त्याला नकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने चिनी तरुणाईच्या मनात असंतोष व अस्वस्थता साचू लागली. शांघाय शहरामधील विद्यापीठांतील फलकबाजीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या त्या घुसमटीला प्रथम अवकाश लाभला. ते लोण वेगाने अन्य शहरांतील विद्यापीठांमध्येही पसरू लागले. बीजींग विद्यापीठात २२ डिसेंबर १९८६ या दिवसापासून विद्यार्थ्यांची निदर्शने चालू झाली. प्रसंगी ती निदर्शने इतकी उग्र असत की त्यांपायी शहरातील वाहतूकही ठप्प होण्याची परिस्थिती उद्भवे. Hu Yeobang आणि पक्षातील अन्य नेते यांच्या पक्षांतर्गत संघर्षाशी समांतर अशाच या साऱ्या घडामोडी तिथे घडत होत्या. विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने संघटित झालेली आंदोलने, मोर्चे कम्युनिस्ट पक्षातील कडव्या घटकांनी दडपून टाकले. 'बूर्ज्वा उदारमतवाद', अशा शेलक्या शब्दांत त्या नवप्रेरणांचा उपहास करत चिनी कम्युनिस्ट पक्षातील कडव्यांनी विद्यार्थीवर्गाच्या मनातील स्वातंत्र्योत्सुक अशा त्या भावभावनांची उपेक्षा जारी राखली.

या सगळ्या अस्वस्थतेला पार्श्वभूमी लाभलेली होती ती चीनमध्ये सघन बनत असलेल्या आर्थिक आघाडीवरील कोंडीची. शेतीच्या उत्पादनवाढीला पडत चाललेल्या

मर्यादा, पायाभूत सुविधांच्या निर्मितीखातर शासनसंस्थेने केलेल्या भरभक्कम खर्चापायी अर्थव्यवस्थेत निर्माण झालेला महागाईचा माहौल, महागाईला लगाम घालण्याच्या उद्देश्याने अवलंबलेल्या कठोर पतधोरणापायी व्याजदर सरासरीने वाढून खुरटलेली गुंतवणूक व त्यांपायी अडखळलेला आर्थिक विकास... अशा नानाविध कारणांपायी सर्वसामान्य चिनी मानस अस्वस्थ व अशांत होते. मुख्यत्वेकरून, वाढती महागाई, प्रशासनातील अधिकारवर्गाचा वाढता भ्रष्टाचार आणि घराणेशाही यांबद्दल सर्वसाधारण चिनी नागरिक १९८७ सालाच्या तोंडावर अस्वस्थ बनत चाललेला होता.

अशा सगळ्या अस्थिर पार्श्वभूमीवर, प्रजातंत्रात्मक व्यवस्थेस पूरक अशा राजकीय सुधारणांबाबतचा Hu Yeobang यांचा धोशा वाढता राहिल्याने चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या सरचिटणीसपदाचा राजीनामा त्यांच्याकडून १९८७ साली जबरदस्तीने घेण्यात आला. त्या वेळचे बदलते चिनी मानस कम्युनिस्ट पक्षाच्या उच्चस्तरीय नेतृत्वादरम्यानची ही सारी खडाखडी संवेदनशीलतेने टिपत-जपत राहिले. आर्थिक सुधारणांचा लाभ मिळालेले चिनी समाजातील जे घटक लोकशाही राज्यपद्धती अधिक मोठ्या प्रमाणावर चीनमध्ये अवतरावी अशा मताचे होते त्यांच्या लेखी, साहजिकच, Hu Yeobang हे 'हीरो' होते. चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या सरचिटणीस पदावरू न गच्छन्ती झाल्यानंतर, एका अर्थाने, राजकीय विजनवासात गेलेल्या Hu Yeobang यांचे १९८९ सालातील एप्रिल महिन्याच्या १५ तारखेस निधन झाले. २२ एप्रिल १९८९ हा त्यांच्या अंत्ययात्रेचा दिवस मुकर्रर करण्यात आलेला होता.

**सुप्त असंतोषाला संघटित रूप**

आर्थिक सुधारणांच्या जोडीनेच राजकीय सुधारणांबाबतदेखील आग्रही राहणाऱ्या Hu Yeobang यांच्याबद्दल नवमध्यमवर्गासह एकंदरच विद्यार्थीवर्गाच्या मनात आदर व आस्था वसत होतीच. त्यांच्या निधनाची वार्ता प्रसृत झाल्यापासून, म्हणजे, १५ एप्रिल १९८९ या दिवसापासूनच विद्यार्थ्यांचे जत्थे उत्स्फूर्तपणे तिआनमेन चौकात जमून यांना आदरांजली वाहताना दिसू लागले. Hu Yeobang यांचे छायाचित्र असणाऱ्या फलकांच्या पुढ्यात नतमस्तक होत विद्यार्थी तसेच अन्य नागरिक पुन्हा परतत होते. 'संघटित ठिय्या आंदोलन', असे कोणतेही रंगरूप त्या दरम्यान त्या उस्फूर्त कृतींना तिथे लाभलेले नव्हते. १८ एप्रिल १९८९ या दिवशी तर तिआनमेन चौकात जमा झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या हजारो-लाखोंच्या घरात गेली. यथावकाश, 'राजकीय स्वातंत्र्यासाठी लढलेला हुतात्मा', असे वलय Hu Yeobang यांच्या भोवती निर्माण होऊन त्यांच्या अंत्ययात्रेत सहभागी होण्यासाठी

लक्षावधी विद्यार्थी २२ एप्रिल १९८९ या दिवशी तिआनमेन चौकात एकत्रित जमा झाले. लोकशाहीपूरक अन्य सुधारणादेखील चीनमध्ये राबविण्यात याव्यात, या मागणीला तिथे संघटित रूप व पाठबळ लाभले आणि बघता बघता तिथे जमलेले लाखो विद्यार्थी त्या मागणीचा पाठपुरावा करण्यासाठी तिआनमेन चौकात ठिय्या देऊन बसले. केवळ इतकेच नाही तर, बीजिंगच्या जोडीनेच Shanghai, Nanging, Xi'an, Changsha, Chengdu यांसारख्या अन्य मोठ्या शहरांमध्येदेखील आंदोलनाचे लोण पसरले. या शहरांमध्येही निदर्शने उफाळून आली.

हे आंदोलन कसे हाताळावे व त्यास कशा प्रकारचा प्रतिसाद द्यावा, यांबाबत चिनी नेतृत्वामध्येच प्रथम दुफळी पडली. सदर आंदोलन म्हणजे चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाला थेट आव्हान असून ते 'क्रांतिविरोधी' असल्याचे जाहीर व प्रगट ऐलान चिनी शासनाचे मुखपत्र असणाऱ्या 'पीपल्स डेली' या वृत्तमाध्यमाने २६ एप्रिल १९८९ या दिवशी केले. केवळ इतकेच नव्हे तर, विद्यार्थ्यांचे ते कृत्य म्हणजे शासनसंस्थेविरुद्धचा पद्धतशीर व नियोजनबद्ध कटच होय, अशीदेखील संभावना त्या संपादकीयामध्ये केलेली होती. एका प्रकारे, आपल्या राष्ट्रभक्तीबाबतच शासनसंस्था संशय घेते आहे, अशी भावना संपादकीयामधील भाषेमुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रसृत झाली आणि त्यांच्या भावना अधिकच तीव्र बनल्या. अशा प्रकारचा कडक सूर पक्षामधून व्यक्त होत असतानाच, आंदोलनाबाबत विद्यार्थ्यांशी चर्चा करावी, असाही सबुरीचा दुसरा स्वर पक्षातूनच समांतर उमटत होता.

आंदोलनात उस्फूर्तपणे सहभागी झालेल्या व होत असलेल्या विद्यार्थ्यांच्या मागण्यांना आर्थिक व सामाजिक असे दोन्ही पदर होते. शिक्षणाच्या तसेच नोकरीच्या/रोजगाराच्या संधींमध्ये वाढ घडून आणली जावी, चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या 'काडर'चे घटक असणाऱ्यांच्या मुलांबाळांना दिले जाणारे विशेष लाभ खालसा करण्यात यावेत, नागरिकांच्या गरजांना शासनसंस्थेकडून अधिक वाढीव व संवेदनशील प्रतिसाद मिळावा आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या कक्षा अधिक विस्तारल्या जाव्यात, उफाळलेल्या महागाईबाबत उपाययोजना केली जावी, शासनसंस्थेत विविध स्तरांवर बोकाळलेल्या भ्रष्टाचाराला कठोर पायबंद घातला जावा... या मागण्यांभोवती विद्यार्थ्यांच्या आशाआकांक्षा गुंफलेल्या होत्या. दरम्यान, आर्थिक सुधारणांच्या जोडीनेच राजकीय तसेच सामाजिक सुधारणांची मागणी लावून धरत चिनी समाजातील अन्य घटकदेखील विद्यार्थ्यांच्या जोडीनेच तिआनमेन चौकातील ठिय्या आंदोलनात सहभागी होऊ लागले. विद्यार्थ्यांच्या राष्ट्रभक्तीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा

जो पवित्रा २६ एप्रिल १९८९ रोजी प्रकाशित झालेल्या संपादकीयात व्यक्त झालेला होता त्याचा निषेध करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर २७ एप्रिल १९८९ या दिवशी विद्यार्थ्यांनी संघटित व्हावे, असे आवाहन विद्यार्थ्यांच्या त्या आंदोलनाचे नेतृत्व स्वीकारलेल्यांनी केले. त्या आवाहनाला अभूतपूर्व असा प्रतिसाद लाभला आणि तिआनमेन चौकाचा अवघा परिसर २७ एप्रिल १९८९ या दिवशी जनसागराने दूरवरपर्यंत व्यापून गेला. लोकशाही राज्यप्रणालीची आणि जुन्या व वयोवृद्ध नेतृत्वाच्या जागी नवीन तरूण नेतृत्वाला वाव देणाऱ्या राज्यघटनेची मागणी करणारे फलक ठिकठिकाणी दिसू लागले. चिनी प्रसारमाध्यमांवरील निर्बंधांचे शिथिलीकरण करण्यात यावे तसेच आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांशी शासनव्यवस्थेतील उच्चपदस्थांनी प्रत्यक्ष संवाद साधावा, या मागण्याही आक्रमकपणे मग पुढे येऊ लागल्या.

आंदोलनाचा केंद्रबिंदू राहिलेल्या बीजींग विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी १० मे १९८९ या दिवशी काढलेल्या सायकल मोर्चाला प्रचंड प्रतिसाद लाभला. ११ मे १९८९ या दिवशी आंदोलनाने एकदम वेगळेच वळण घेतले. तिआनमेन चौकात ठाण मांडून बसलेल्या विद्यार्थ्यांनी १३ मे १९८९ या दिवसापासून उपोषण आरंभावे, असे आवाहन आंदोलनाच्या नेतृत्वाने केले.

सोव्हिएत रशियाचे सर्वोच्च नेते गोर्बाचेव्ह यांचा चीन दौरा १५ मे १९८९ या दिवशी सुरू होणार होता. चीन आणि रशिया या उभय देशांच्या लेखी अतिशय महत्त्वाच्या ठरणाऱ्या या दौऱ्यादरम्यान विद्यार्थ्यांच्या आंदोलनापायी कोणताही अनवस्था प्रसंग उद्‌भवू नये यांबाबत डेंग अतिशय सावध व ठाम होते. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत त्यांनी तिथवर सबुरीचे धोरण अंगीकारण्यामागेदेखील गोर्बाचेव्ह यांची चीन भेट हेच मुख्य कारण होते. मात्र, त्याच वेळी आंदोलनाची तीव्रता उत्तरोत्तर वाढतच चालली होती. १४ मे १९८९ या दिवशी चीनमधील विचारवंत, बुद्धीजीवी, पत्रकार, शिक्षणक्षेत्रातील अग्रणीदेखील विद्यार्थ्यांच्या मोर्चांमध्ये उघड उघड सामील झाले. गोर्बाचेव्ह यांनी १५ मे १९८९ या दिवशी चिनी भूमीवर पाऊल ठेवले त्या दिवशी तर उपोषणाला बसलेल्या विद्यार्थ्यांनी तिआनमेन चौक फुलून गेलेला होता. अधिकृत भेटीनंतर गोर्बाचेव्ह मायदेशाकडे रवाना झाले आणि आंदोलनाला अधिकच धार चढली. डेंग यांच्यावर व्यक्तिगत टीका तीव्र स्वरात उघडपणे होऊ लागली. आंदोलनाबाबत पाठिंबा व सहानुभूती असणाऱ्या काही बुद्धिवंतांनी १७ मे १९८९ या दिवशी प्रसृत केलेल्या जाहीर प्रगटनामध्ये डेंग यांचा निर्देश 'हुकुमशहा' असा केला गेला. उपोषणकर्त्या विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यास

खुद्द डेंग यांनी तिआनमेन चौकात यावे, असा आग्रह व्यक्त करणारे फलकही डोके वर काढू लागले. सुमारे १५ लाखांचा जमाव १७ मे १९८९ या दिवशी तिआनमेन चौकात जमलेला होता, असा हवाला बीजींगमधीलच एका माध्यमाने दिला. विद्यार्थ्यांच्या जोडीनेच चिनी कामगार, माध्यमकर्मी, चिनी अधिकारी वर्ग एवढेच काय चिनी कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्तेदेखील आंदोलनकर्त्यांमध्ये सहभागी झाल्याचे चित्र दिसत होते.

परिस्थती हाताबाहेर चालली आहे हे स्पष्ट होताच, २० मे १९८९ या दिवशी 'मार्शल लॉ' जारी करण्यात आला. सर्व प्रकारचे हरताळ, मोर्चे व निदर्शने यांवर बंदी जाहीर झाली. ३१ मे १९८९ रोजी शासनाने एक अतिशय कडक प्रगटन जारी केले. त्याचा मतितार्थ उमजलेले बहुतेक विद्यार्थी चौकातून पाय काढते झाले. अगदी कट्टर आंदोलनकर्तेच काय ते मागे उरले. ४ जून १९८९ च्या पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास रणगाड्यांच्या पलटणीने चौक व्यापला. उरलेसुरले विद्यार्थी तिथून निघून गेले. विद्यार्थ्यांनी उभारलेल्या तात्पुरत्या राहुट्या बघताबघता जमीनदोस्त झाल्या. लष्करी कारवाईमध्ये नेमके किती आंदोलककर्ते जखमी झाले अथवा प्राणास मुकले यांबाबत अधिकृतरीत्या शासनाकडून काहीच तपशील प्रसृत केला गेला नाही. मूठभरांचा उठाव शांत करण्यात आलेला आहे, एवढेच काय ते अधिकृत प्रगटन प्रसारित झाले. काहीच विशेष फारसे घडले नाही अशा आविर्भावात चिनी शासनयंत्रणा पूर्ववत कार्यरत बनली. गजबजलेला चौक रिकामा केला गेला होता आणि चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या कारभारव्यवस्थेभोवतालची पोलादी भिंत अभेद्यच राहिली होती!

# जर्मनी

## प्रवक्त्याच्या अनवधानापायी ढासळली भिंत...!

दोन बलदंडांच्या लठ्ठालठ्ठीमध्ये एखादा शक्तिहीन भरडला जाण्याची उदाहरणे व्यवहारात आपल्या भवताली हरदिन साकारत असतात. एकाच शहराला दोन भागांत विभागणाऱ्या एका भिंतीचा जन्म झाला तो नेमक्या याच कार्यकारणभावाद्वारे. १२ आणि १३ ऑगस्टला जोडणाऱ्या १९६१ सालातील त्या रात्री जर्मनीतील बर्लिन शहराच्या पश्चिम भागाच्या भोवती तारेच्या काटेरी कुंपणाचा वेढा पडला आणि 'पूर्व बर्लिन' आणि 'पश्चिम बर्लिन' अशा दोन विभागांत त्या शहराचे विभाजन घडवून आणले गेले. पश्चिम बर्लिनला वेटाळणाऱ्या याच काटेरी कुंपणाचे रूपांतर, टप्प्याटप्प्याने यथावकाश, चिरेबंदी भिंतीमध्ये घडवून आणले गेले आणि चौफेर पसरलेल्या पूर्व बर्लिनशी असलेला शहराच्या त्या अंशाचा संपर्क-अनुबंध पूर्णपणे खंडित करण्यात आला. सोव्हिएत संघराज्यामध्ये खुलेपणाचे आणि आर्थिक पुनर्रचनेचे वारे खेळायला लागल्यानंतर एकंदरच पूर्व युरोपात जे राजकीय परिवर्तन सक्रिय बनले त्याला पूर्व जर्मनीतील नागरी असंतोषाच्या रेट्याची जोड लाभली आणि बर्लिन शहराला कृत्रिमरीत्या विभागणारी ती इतिहास(कु)प्रसिद्ध भिंत ९ नोव्हेंबर १९८९ या दिवशी अगदी अवचितच इतिहासजमा झाली. अतर्क्य योगायोगाने अवतरलेला तो केवळ आणि निव्वळ एक अपघात होता, असे म्हणणे कणभरदेखील अतिशयोक्ती ठरणार नाही.

बर्लिन भिंतीच्या तशा अगदी अनपेक्षितपणे घडून आलेल्या गच्छन्तीचे जागतिक समुदायाकडून स्तंभित परंतु सहर्ष स्वागत झाले. भिंतीचे पतन अगदी अचानक घडून आले ही वस्तुस्थिती असली तरी तिची निर्मिती ही मात्र प्रदीर्घ काळ साकारत राहिलेल्या सत्ताखेळाची आणि त्याच्या मुळाशी असणाऱ्या शीतयुद्धाची देणगी होती. सत्तासूत्रे आपल्या हातात एकवटण्यासाठी आसुसलेल्या विस्तारवादी जेत्यांच्या निर्मम साठमारीमध्ये जित राष्ट्राची कशी ससेहोलपट होते त्याचा बर्लिनची विभागणी हा जणू आदर्श नमुनाच ठरावा. तो सगळाच घटनाक्रम मुळातून जाणून घ्यावयास हवा.

**विभाजन देशाचे आणि शहराचेदेखील...**

दोस्त राष्ट्रांच्या संघटित सामरिक सामर्थ्यापुढे गुडघे टेकलेल्या जित जर्मनीचे, दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस चार प्रादेशिक विभागांत विभाजन करण्यात आले. ते चार खंड चार निरनिराळ्या सत्तांनी आपले अंकित बनवले. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स आणि सोव्हिएत संघराज्य या त्या चार सत्ता. जर्मनीच्या अशा चार फळ्या करण्याच्या धोरणविधानावर १७ जुलै ते २ ऑगस्ट १९४५ या कालावधीदरम्यान आयोजित पॉट्सडॅम परिषदेदरम्यान शिक्कामोर्तब करण्यात आले. यथावकाश अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्स यांनी पश्चिम जर्मनीवर आपली सत्ता स्थापन केली. तर, सोव्हिएत संघराज्याने त्याच्या अधिपत्याखाली आणला पूर्व युरोप. भौगोलिकदृष्ट्या बर्लिन शहर जरी सोव्हिएत संघराज्याने अंकित केलेल्या प्रांतामध्ये वसलेले होते तरी त्या शहराचेदेखील चार भाग करण्यात आले. अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्स या तीन देशांनी बर्लिन शहराचा पश्चिम भाग आपल्या पंखाखाली घेतला तर, सोव्हिएत संघराज्याने बर्लिनच्या पूर्व भागावर त्याची मांड पक्की केली.

जर्मनीचे आणि बर्लिन शहराचे अशा दोन विभागांत करण्यात आलेले विभाजन ही, दुसरे महायुद्ध ऐन भरात असतानाच दोस्त राष्ट्रांमध्ये रंगलेल्या सत्तेच्या ओढाताणीची परिणती होती. नाझी जर्मनीच्या आक्रमक विस्तारवादाचा मुकाबला करण्यासाठी एकत्रित आलेल्या दोस्त राष्ट्रांदरम्यानचे परस्परसंबंध, तसे बघितले तर, १९४२ सालापासूनच ताणायला लागलेले होते. युद्धोत्तर युरोपचे रंगरूप नेमके कसे असावे, यांबाबतच्या मतैक्याकडे वाटचाल होण्याच्या काळात दोस्त राष्ट्रांमधील आधीच ताणलेले संबंध अधिकच तणावपूर्ण बनले. वैश्विक स्तरावरील महासत्ता म्हणून, आकारमान आणि सामर्थ्याच्या दृष्टीने बलदंड असलेल्या अमेरिका आणि सोव्हिएत संघराज्य या दोन राष्ट्रांचा उदय १९४५ सालापासूनच क्रमाक्रमाने घडून येण्यास प्रारंभ झालेला होता. इथे एक मोठी विलक्षण बाब नीट समजावून घ्यावयास हवी. ती अशी की, विचारसरणीच्याबाबतीत अमेरिका आणि सोव्हिएत संघराज्य या दोन महासत्ता दोन परस्परविरोधी ध्रुवांवर उभ्या होत्या. केवळ इतकेच नाही तर, युद्धोत्तर जगावर आपली प्रभुसत्ता प्रस्थापित करण्यासाठी त्या उभय महासत्ता एकसारख्याच आसुसलेल्यादेखील होत्या.

युद्धात पराभूत झालेला जर्मनी दोन महासत्तांदरम्यानच्या शीतयुद्धाचा केंद्रबिंदू बनला. आणि 'पूर्व' व 'पश्चिम' या दोन वैचारिक ध्रुवांमधील तफावत ज्या प्रमाणात अधिक गहिरी बनत गेली तिचे प्रतिबिंब द्विखंडित जर्मनीमध्येदेखील तितक्याच

सखोल-सघनपणे डोकवू लागले. सरतेशेवटी अखेर जर्मनीच्या त्या दोन शकलांचे रूपांतर १९४९ साली दोन स्वतंत्र राष्ट्रांमध्येच घडून आले. 'फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनी' (पश्चिम जर्मनी) आणि 'डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ जर्मनी' (पूर्व जर्मनी) असे दोन देश वैश्विक नकाशावर उदयास आले. पश्चिम जर्मनीचा सांधा जुळलेला होता व राहिला तो अमेरिका, ब्रिटन व फ्रान्स यांसारख्या पश्चिमी लोकतंत्रप्रधान राज्यप्रणालीशी. तर, पूर्व जर्मनीचे सूत जुळले होते सोव्हिएत संघराज्याने शिरोधार्य मानलेल्या साम्यवादी विचारसरणीशी. पश्चिम जर्मनीबरोबर असणारी सीमा पूर्व जर्मनीने १९५२ साली सीलबंद केली. परंतु, पूर्व व पश्चिम बर्लिनदरम्यानची सीमा मात्र खुली होती.

**वाढता वाढता वाढे...**

परंतु, एका परीने, आपल्या त्या कृत्याचा पश्चात्तापच जणू पूर्व जर्मनीच्या सत्ताधीशांना पुढील काळात झाला! पूर्व जर्मनीमधील बंदिस्त, कठोर कम्युनिस्ट राजवटीच्या कार्यपद्धतीला विटलेल्या सुमारे २५ लाख नागरिकांनी १९४९ ते १९६१ या काळात पूर्व जर्मनीमधून पश्चिम जर्मनीमध्ये पलायन केले. पूर्व आणि पश्चिम बर्लिनदरम्यानची सीमा सीलबंद नसल्याचा लाभ अचूक उठवत पूर्व जर्मनीतील नागरिकांनी पश्चिम जर्मनी जवळ केला.

अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्स या खुल्या बाजारपेठीय अर्थकारणाची धोरणदृष्टी अवलंबलेल्या पश्चिम जर्मनीमधील एकंदरीनेच मुक्त पर्यावरणाकडे पूर्व जर्मनीमध्ये काटेकोर निर्बंधमय जीवन जगणारे नागरिक आकर्षित व्हावेत, हे तसे स्वाभाविकच होते. पलायनाद्वारे पश्चिम जर्मनीकडे धाव घेणाऱ्या पूर्व जर्मनीतील नागरिकांमध्ये कुशल कर्मचारी, व्यावसायिक व समाजातील बुद्धिजीवींचे तौलनिक प्रमाण ज्या वेगाने उत्तरोत्तर वाढू लागले त्या प्रमाणात पूर्व जर्मनीच्या अर्थकारणाचा पाया विसविशीत होण्याच्या शक्यता व धोका वाढू लागला. त्या वास्तवाची परिणती हेरून जागे झालेल्या पूर्व जर्मन शासनसंस्थेने फर्मान जारी करून १९६१ सालातील १२-१३ ऑगस्टच्या रात्रीदरम्यान पूर्व बर्लिन आणि पश्चिम बर्लिन यांच्यादरम्यानच्या सीमेवर काटेरी तारांचे कुंपण उभारून दळणवळण बंद करून टाकले. असे अडथळे निर्माण करण्याचे काम चालू असतानादेखील या ना त्या प्रकारे सुमारे पाच हजार नागरिकांनी पश्चिम जर्मनीमध्ये प्रवेश मिळवलाच. तशाच प्रयत्नांमध्ये जवळपास तितक्याच संख्येने असणाऱ्या जर्मन नागरिकांना पूर्व जर्मन शासनसंस्थेच्या सुरक्षा दलांनी बंदिवान बनवले. त्या दरम्यान झालेल्या हातघाईदरम्यान १९१ पेक्षा अधिक नागरिक मृत्युमुखीदेखील पडले.

रातोरात उभारलेल्या तारांच्या काटेरी कुंपणाचे रूपांतर पूर्व जर्मनीतील सत्ताधीशांनी यथावकाश सीमेन्टच्या १५ फूट उंचीच्या मजबूत भिंतीमध्ये घडवून आणले. तिच्या माथ्यावर पुन्हा काटेरी तारांची वेटोळी होतीच. जोडीने, ठायी ठायी टेहेळणी मनोरे व बंदुकांसाठी चबुतरे उभारले जाऊन बर्लिन शहराच्या पूर्व व पश्चिम अशा दोन शकलांदरम्यान ये-जा करण्याचे प्रयत्न कोणत्याही माध्यमातून होऊ नयेत याची पक्की व्यवस्था केली गेली.

हे पुरेसे नव्हते म्हणून की काय, भिंतीमध्ये विद्युतप्रवाह खेळता राहण्याची क्लृप्ती लढवून ती अधिकच अभेद्य बनवण्यात आली. उलटत्या वर्षांबरोबर 'वाढता वाढता वाढे...', या न्यायाने भिंतीचाही व्याप वाढता राहिला. यथावकाश, दोन्ही बर्लिनना परस्परांपासून विलग करणाऱ्या तटबंदी व कोट यांचे जडाव ल्यालेल्या त्या भिंतीची लांबी ४५ किलोमीटरपर्यंत वाढविण्यात आली. वाढीव बांधकाम तिथेच थांबले नाही. भिंतीचा विस्तार त्याहीपुढे १२० किलोमीटरपर्यंत वाढवून पश्चिम बर्लिनचा उर्वरित पूर्व जर्मनीपासूनचा संपर्क-संबंध पूर्णतया खंडित केला गेला.

सोव्हिएत राष्ट्रसंघाच्या धर्तीवरील सर्वंकष अशा केंद्रवर्ती नियोजनबद्ध व्यवस्थेमध्ये, काळाच्या ओघात पूर्व जर्मनीच्या अर्थविकासाला खीळ बसू लागली. महागाई, जिनसांचा तुटवडा, बेरोजगारी यांपायी गांजलेल्या नागरिकांमध्ये बदलाबाबतची मानसिकता बळावू लागली. त्यांतच, १९८०च्या दशकाचा मध्य उलटल्यानंतर अवघ्या पूर्व युरोपात आणि मुख्यत: सोव्हिएत राष्ट्रसंघात देशोदेशी पुनर्रचनेबाबतचा आग्रह वेगाने मूळ धरू लागला. सोव्हिएत संघराज्याचे भवितव्य १९८६ मधील चर्नोबिलच्या हादऱ्यापायी अनिश्चित बनत चालल्याची लक्षणे दिसायला लागलेली होती. त्या कोंडीला प्रथम तोंड फुटले ते हंगेरीमध्ये १९८९ सालातील मार्च महिन्यात. लोकशाहीची मागणी करणाऱ्या निदर्शनांना जागोजागी तोंड फुटत होते. त्या रेट्याद्वारे हंगेरी आणि ऑस्टिया यांच्यादरम्यानचे २४० किलोमीटरचे काटेरी तारांचे कुंपण जमीनदोस्त झाले. सोव्हिएत संघराज्याच्या पोलादी साम्राज्याला तडे जाऊ लागल्याचे ते पहिलेवहिले चिन्ह ठरले. पोलंडमध्येही सत्तारूढ सरकारने लोकशाहीच्या मागणीबाबत तडजोडीची भूमिका स्वीकारली.

त्यांतच, १९८९ सालातील ऑगस्ट महिन्यात सोव्हिएत संघराज्याचे घटक असणाऱ्या एस्टोनिया-लाटविया-लिथुआनिया या तीन देशांमधील २० लाखांहून अधिक नागरिकांच्या उत्स्फूर्त उठावाद्वारे 'सिंगिंग रेव्होल्यूशन'चा जन्म घडून आला. बाल्टिक प्रजासत्ताक देशांमधून तब्बल ६०० किलोमीटर लांबीची मानवी साखळी

खडी करून तिच्याद्वारे स्वातंत्र्याची मागणी आक्रमक अग्रहानिशी व्यक्त करण्यात आली. या सगळ्या चळवळींपासून पूर्व जर्मनीमधील जनमानस अ-स्पर्शित राहणे शक्यच नव्हते.

हंगेरीने ऑस्ट्रियाबरोबरची सीमा खुली केल्यामुळे पूर्व जर्मनीतील नागरिकांना तिथून पश्चिम जर्मनीमध्ये प्रवेश मिळवणे सुकर बनले. पश्चिम जर्मनीमध्ये जाण्यास त्यांना लगेचच चेकोस्लोव्हाकियानेदेखील रस्ता खुला केला. त्या पलायनाला पायबंद बसावा म्हणून पूर्व जर्मनीच्या सत्ताधीशांनी चेकोस्लोव्हाकियाबरोबरची सीमा १९८९ सालातील ऑक्टोबर महिन्यात सीलबंद केली खरी परंतु उठावाचे वारे तोवर पूर्व जर्मनीमध्ये प्रवेशलेले होते. पूर्व जर्मनीच्या निर्मितीचा ४०वा वाढदिवस उलटतो न उलटतो तोच खुलेपणाच्या मागणीचे नारे देत पूर्व जर्मनीचे सुमारे ७० हजार नागरिक रस्त्यावर उतरले. ३१ ऑक्टोबर १९८९चा दिवस उजाडेपर्यंत ती संख्या पोहोचली होती चांगली पाच लाखांवर. त्या उठावाला सुरुवात झाल्यापासून महिन्याने, म्हणजे, ४ नोव्हेंबर १९८९ रोजी पाच लाखांहून अधिक नागरिक पूर्व बर्लिनमधील मुख्य चौकात एकत्रपणे गोळा झाले. जनसामान्यांच्या भावनांची तीव्रता जाणून पूर्व जर्मनीतील शासकांनी देशांतरासंदर्भातील नियमांमध्ये शिथिलता आणण्याचा निर्णय घेतला. काही अटीशर्तींनिशी पूर्व जर्मनीतील नागरिकांना पश्चिम जर्मनीमध्ये प्रवेश करण्यास मुभा देण्याबाबत तरतुदी त्यांनुसार निश्चित करण्यात आल्या. त्या संदर्भातील प्रकट घोषणा करण्यासंदर्भातील अधिकृत निवेदन पक्षाचे प्रवक्ते Günter Schabowski यांच्या स्वाधीन करण्यात आले. पत्रकार परिषदेस संबोधित करण्यास येतेवेळी Günter Schabowski यांनी ते निवेदन नीट वाचलेलेच नव्हते. त्यांमुळे, 'देशाबाहेर जाण्यासाठी अर्ज करण्यास आता अनुमती देण्यात येते आहे', असा निवेदनाचा गोषवारा त्यांनी विदित केला. 'या निर्णयाची अंमलबजावणी लगोलग केली जाते आहे', असेही त्यांनी घोषित करू न टाकले. मात्र, 'या संदर्भात काही मार्गदर्शक तत्वे निर्धारित करण्यात आलेली आहेत', हा निवेदनातील अंश पत्रकारांसमोर घाईघाईने येतेवेळी त्यांनी नीट वाचलेलाच नव्हता. जमलेल्या पत्रकारांचा आणि नागरिकांचा त्यांच्या कानांवर विश्वास बसेना. ज्या वेळी घोषणेचा पूर्ण अर्थ त्यांना उमगला त्यांवेळी हर्षानंदाने अक्षरश: भान हरपलेल्या अगणित नागरिकांच्या उत्साहपूर्ण उन्मादाने एकाच शहराच्या आणि पर्यायाने एका देशाच्या दोन अंगांना परस्परांपासून विलग करणाऱ्या भिंतीचा पाया अत्यल्प अल्पावधीत ढासळला!

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथलयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलाकडे व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## अर्थबोधपत्रिका मासिक
## वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २००/– रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/– रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/– रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८००/– रुपये** |

**The Bank details for NEFT are as under :**
- Bank Name : **Vidya Sahakari Bank S.B. Road, Pune 411016.**
- Account Name : **Indian School of Political Economy**
- Bank Account No. : **200403130004208**
- NEFT/RTGS No. : **SVCB0003004**
- IFSC Code : **SVCB0003004**